सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २५ ऑक्टोंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १८९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

देशात 11 कोटी फार्मर आयडी बनवण्याचे लक्ष्य पाच महिने आधीच पूर्ण

नवी दिल्ली: केंद्र सरकारने निर्धारित मुदतीपूर्वीच देशात 11 कोटी शेतकरी विशिष्ट डिजिटल ओळखपत्रे (Farmer ID) तयार करण्याचे मोठे यश मिळवले आहे. 'विकसित भारत-समृद्ध शेतकरी' या संकल्पनेच्या दिशेने हे ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी ही महत्त्वाची घोषणा केली आहे.

नियोजित वेळेपूर्वीच लक्ष्याची पूर्ती

कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशाच्या कृषी क्षेत्रातील डिजिटल क्रांतीला गती देत 23 ऑक्टोबरच्या रात्रीपर्यंत 11 कोटी फार्मर आयडी बनवण्याचे काम यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. हे महत्त्वाकांक्षी लक्ष्य गाठण्यासाठी 31 मार्च 2027 पर्यंतची मुदत होती. मात्र, केंद्र आणि राज्य सरकारांच्या समन्वित प्रयत्नांमुळे हे उद्दिष्ट तब्बल पाच महिने आधीच साध्य करण्यात आले आहे.

योजनेचे फायदे आणि पारदर्शकता

कृषी मंत्रालयाच्या 'डिजिटल कृषी मिशन' अंतर्गत मिळालेल्या या यशामुळे अन्नदात्या शेतकऱ्यांपर्यंत सरकारी योजना, बँक कर्ज, पीक विमा आणि आपत्ती मदतीचा लाभ अत्यंत पारदर्शक व जलद पद्धतीने पोहोचणार आहे. या नव्या डिजिटल व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना वारंवार कागदपत्रे जमा करण्याच्या आणि सरकारी कार्यालयांचे हेलपाटे मारण्याच्या त्रासापासून मोठा दिलासा मिळणार आहे.

सुलभ कर्ज प्रक्रिया: किसान क्रेडिट कार्ड (KCC) आणि बँक कर्जे मिळवणे सोपे होईल.

पारदर्शक पीक विमा: प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत नुकसानीचे मूल्यांकन व भरपाई देण्याची प्रक्रिया अधिक पारदर्शक होईल.

मध्यस्थांना आळा: किमान आधारभूत किंमत (MSP) खरेदीत मध्यस्थांची भूमिका कमी होऊन थेट पात्र शेतकऱ्यांची ओळख निश्चित करणे सुलभ होईल.

सहकारी संघराज्यवादाचे उत्तम उदाहरण

केंद्र सरकारने 2 सप्टेंबर 2024 रोजी 'डिजिटल कृषी मिशन' सुरू केले होते. या माध्यमातून शेतकऱ्यांचा सत्यापित डिजिटल डेटाबेस तयार करून कृषी सेवांना डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरशी (डीपीआय) जोडले जात आहे. या यशस्वी मोहिमेचे श्रेय कृषिमंत्र्यांनी केंद्र, राज्य सरकारे, जिल्हा पथके आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या एकत्रित परिश्रमाला दिले असून, हे सहकारी संघराज्यवादाचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पुंछमध्ये संशयास्पद स्फोटक साहित्याचे 7 कंटेनर जप्त; सुरक्षा दलांची संयुक्त शोधमोहीम

पुंछ: जम्मू-काश्मीरमधील सीमावर्ती पुंछ जिल्ह्यात सुरक्षा दलांनी एका संयुक्त शोधमोहिमेदरम्यान संशयित दहशतवादी अड्ड्यावरून स्फोटक साहित्याचे सात कंटेनर जप्त केले आहेत. मेंढर तहसीलमधील कसबलारी परिसरात शुक्रवारी ही कारवाई करण्यात आली. जप्त केलेल्या साहित्यात आयईडी असण्याची दाट शक्यता वर्तवली जात असून, या कारवाईमुळे सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. गेल्या काही दिवसांत या भागात शस्त्रसाठा सापडण्याच्या घटना वाढल्या आहेत.

कसबलारी परिसरातील कारवाई आणि जप्त केलेले साहित्य मेंढर तहसीलमधील कसबलारी परिसरात 156 टेरिटोरियल आर्मीने दिलेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही संयुक्त शोधमोहीम राबवण्यात आली. शुक्रवारी हाती घेतलेल्या या मोहिमेदरम्यान सुरक्षा दलांना टेपने गुंडाळलेले सात कंटेनर आढळून आले, ज्यामध्ये इम्प्रोव्हाइज्ड एक्स्प्लोसिव्ह डिव्हाइस असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. या कारवाईदरम्यान केवळ कंटेनरच नव्हे, तर इतर संशयास्पद साहित्यही हाती लागले आहे.

राजस्थानमध्ये नाशिकच्या भाविकांच्या वाहनाचा भीषण अपघात; 4 जणांचा मृत्यू, जखमींवर उपचार सुरु

नाशिक : राजस्थानमधील जयपूर येथे नाशिक जिल्ह्यातील भाविकांच्या वाहनाला पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. या अपघातात सटाणा तालुक्यातील अजमेर सौंदाणे येथील 4 भाविकांचा मृत्यू झाला असून, अन्य काही भाविक गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. या घटनेमुळे नाशिक जिल्ह्यातील सटाणा परिसरात शोककळा पसरली आहे.

गिरीश महाजन यांचा राजस्थानच्या राज्यपालांशी संपर्क

अपघाताची माहिती मिळताच नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी मदतकार्याबाबत तातडीने पाठपुरावा केला. त्यांनी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून अपघाताची माहिती घेतली.

अपघातात मृत्यू झालेल्या भाविकांचे शवविच्छेदन लवकरात लवकर पूर्ण करून त्यांचे पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचना देण्याची विनंती महाजन यांनी राज्यपालांकडे केली.

जखमींना योग्य उपचार देण्याची मागणी

अपघातात गंभीर जखमी झालेल्या भाविकांना तातडीने जवळच्या योग्य रुग्णालयात दाखल करून त्यांच्यावर आवश्यक उपचार करावेत, तसेच सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही महाजन यांनी केली.

मंत्री महाजन यांच्या माहितीनुसार, राजस्थानच्या राज्यपाल कार्यालयाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. जखमींना आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांच्या उपचारांवर लक्ष ठेवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यरत असल्याची माहिती राज्यपाल कार्यालयाकडून देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

सटाणा परिसरात शोककळा

राजस्थानमध्ये धार्मिक यात्रेसाठी गेलेल्या भाविकांवर ओढवलेल्या या संकटामुळे अजमेर सौंदाणे गावासह सटाणा तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, जखमी भाविक लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना केली जात आहे.

अपघाताचे नेमके कारण, जखमींची संख्या आणि त्यांची प्रकृती याबाबत अधिकृत माहिती मिळाल्यानंतर पुढील तपशील स्पष्ट होणार आहेत.

नाशिकमध्ये 2,230 किलो मसाले जप्त; किंमत तब्बल 11.86 लाख रुपये

नाशिक : सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अन्नपदार्थांच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (FDA) नाशिकमध्ये मोठी कारवाई केली आहे. द्वारका परिसरातील 'मे. सोमेश्वर घरगुती मसाले' या आस्थापनेवर छापा टाकून तब्बल २ हजार २३० किलो मसाल्यांचा साठा जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या मालाची एकूण बाजारभावानुसार किंमत ११ लाख ८६ हजार २०० रुपये असल्याची माहिती प्रशासनाने दिली. सण-उत्सव विशेष मोहीम २०२६ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. मसाल्यांच्या पॅकिंगवर लेबलिंगविषयक नियमांचे उल्लंघन आढळल्याने तसेच उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत संशय निर्माण झाल्याने प्रशासनाने हा साठा ताब्यात घेतला.अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे, सहआयुक्त मंगेश माने आणि सहायक आयुक्त (अन्न) व्ही. पी. धवड यांच्या मार्गदर्शनाखाली २२ ऑक्टोबर रोजी ही कारवाई करण्यात आली.

नाशिकच्या गोदातीरावर आज घुमणार 501 शंखांचा निनाद, विश्वविक्रमासाठी शंखवादक सज्ज

नाशिक : सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये उद्या, रविवार (दि. २५ ऑक्टोबर) कोजागरी पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर ५०१ जणांचा सामूहिक शंखनाद आयोजित करण्यात आला आहे. देवमामलेदार पटांगणाजवळ होणाऱ्या या उपक्रमातून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या उपक्रमामुळे गोदातीरावर धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण होणार आहे.

५०१ शंखांचा निनाद; विश्वविक्रमाचे लक्ष्य

एकाच वेळी सर्वाधिक जणांनी शंखनाद करण्याचा विश्वविक्रम प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या ३०३ जणांनी एकाच वेळी शंखनाद केल्याची नोंद असलेला विक्रम मागे टाकण्याचे आयोजकांचे लक्ष्य आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या पथकाकडून सहभागींची उपस्थिती आणि आवश्यक निकषांची पडताळणी केल्यानंतर हा प्रयत्न केला जाणार आहे. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण आणि गुणगौरव न्यास संचालित अनंतविजय शंखनाद पथक यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याशी या उपक्रमाची सांगड घालण्यात आली आहे. ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ध्वजारोहणाच्या नेमक्या क्षणी याच समूहातील २५१ शंखवादक सामूहिक शंखनाद करणार आहेत. त्यामुळे कुंभमेळ्याच्या मंगलारंभावेळी पारंपरिक शंखनादातून धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडणार आहे.

कोहिनूर महाविद्यालयात नवीन मतदार नोंदणी व जनजागृती शिबिराचे आयोजन

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी कोहिनूर कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय खुलताबाद येथे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कमरुनिसा बेगम मॅडम यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेने महाविद्यालयात नवीन मतदार नोंदणी आणि जनजागृतीसाठी विशेष शिबिराचा कार्यक्रम यशस्वी झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मतदान नोंदणी जनजागृती अभियानाचा उद्देश स्पष्ट करण्यात आला. मतदानाचे महत्व, मतदार नोंदणीची आवश्यकता आणि लोकशाही प्रक्रियेमध्ये युवकांची भूमिका यांविषयी विद्यार्थ्यांना जागरूक करण्यावर भर देण्यात आला. कार्याक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट् नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतून नाव वगळणे व मतदार यादीतील नाव दुरुस्ती व स्थलांतर हे होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुभाष जिते यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून मतदान हा लोकशाहीचा पाया असल्याचे स्पष्ट केले. प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदवून मतदानाचा हक्क बजावणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबातील सदस्यांना आणि समाजातील नागरिकांना मतदार नोंदणीसाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालायाचे उपप्राचार्य डॉ. रफीउल्ला खान यांनीही आपल्या विचारांतून विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रियेविषयी जागरूक राहण्याचे महत्व पटवून दिले. युवक हे देशाचे भविष्य असून, त्यांच्यामध्ये सामाजिक व राजकीय जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. असे त्यांनी नमूद केले. पात्र वय पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करून लोकशाही व्यवस्थेत आपला सहभाग नोंदवावा, असे मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी उपस्थित शिक्षकांनीही मतदान नोंदणी, मतदार जागृती आणि जबाबदार नागरिकत्व यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्वतः जागरूक राहून इतरांनाही मतदार नोंदणीसाठी प्रेरित करावे, हा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन वरिष्ठ महाविद्यालयचे लोकप्रशासन विभागाचे प्रमुख अवसरमोल संदीप यांनी व कनिष्ठ महाविद्यालयचे किशोर रावते यांनी केले.

कार्याक्रमचे सूत्रसंचालन सोहेल सय्यद यांनी केले. तसेच प्रास्ताविक सलीम सय्यद यांनी व कार्याक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे आभार शेख रफिक यांनी मांडले. कार्याक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील गजानन बोरसे, फिरोज शेख व फारुख पठाण यांनी यांनी परिश्रम घेतले.

जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

'निरोगी जीवनासोबत पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही पार पाडा' – शिवाजीराव कचरे

अहिल्यानगर : धकाधकीच्या जीवनशैलीमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होत असताना निरोगी आणि सुदृढ जीवनासाठी नियमित व्यायामासोबतच आवडीच्या खेळांसाठी वेळ देणे आवश्यक आहे. खेळांमुळे सांघिक भावना वाढीस लागते, सहकाऱ्यांमध्ये सुसंवाद निर्माण होतो आणि कामाचा ताण कमी होण्यास मदत होते. त्याचबरोबर पर्यावरण व वृक्षसंवर्धनाची जबाबदारी प्रत्येकाने पार पाडावी, असे प्रतिपादन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजीराव कचरे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना व पतसंस्थेच्या वतीने जिल्हा पोलीस परेड मैदानावर आयोजित जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन कचरे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

कचरे म्हणाले की, जिल्हा न्यायालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षसंवर्धन करण्यात आले आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने पर्यावरण, निसर्ग आणि वृक्षांबद्दल आस्था बाळगावी. आपल्या कामाच्या टेबलचा परिसर स्वच्छ ठेवावा तसेच शक्य असल्यास टेबलवर छोटे रोप ठेवावे. हिरवळीमुळे परिसर प्रसन्न राहतो आणि सकारात्मक ऊर्जा मिळते. दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करूनही पर्यावरण संरक्षणासाठी योगदान देता येते.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी अनेकदा तणावाचा सामना करावा लागतो. अशा वेळी व्यायाम आणि खेळ शारीरिक तंदुरुस्ती टिकविण्यासोबतच मानसिक प्रसन्नतेसाठीही उपयुक्त ठरतात. क्रिकेट हा अनेकांचा आवडता खेळ असून, अशा सांघिक खेळांमुळे एकजुटीची भावना वाढते आणि सहकाऱ्यांमधील परस्पर संबंध दृढ होतात, असेही त्यांनी सांगितले.

या स्पर्धेत जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या नऊ संघांनी सहभाग नोंदविला असून, सामने साखळी पद्धतीने खेळविण्यात येणार आहेत. उद्घाटनप्रसंगी शिवाजीराव कचरे यांनी स्वतः क्रिकेट खेळण्याचा आनंद घेतला. यावेळी त्यांनी खेळाचे महत्त्व अधोरेखित करत पर्यावरण व वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला.

कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक उमेश परदेशी, जिल्हा न्यायालयाचे प्रबंधक संदीप कडू, कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक नितीन धोंगडे, कौटुंबिक न्यायालयाचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव कराळे, सरकारी वकील सुरेश लगड, न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव रवींद्र सूर्यपुजारी, पतसंस्थेच्या संचालिका अर्चना झिंजे, सचिव नरेंद्र देशमुख, सुमित दसूर, देवेंद्र शिंदे यांच्यासह न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाणपोई उड्डाणपुलावर दोन दुचाकींची धडक, दोघे जखमी

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२४ ऑक्टोबर - सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील पाणपोई फाटा येथील उड्डाणपुलावर शनिवारी दुपारी दोन दुचाकींची धडक होऊन दोघे जखमी झाले. शरद काळवणे (वय २९, रा. घाणेगाव, वाळूज एमआयडीसी) आणि मिथुन पन्नालाल जाधव (वय १९, रा. अंधारी, ता. चाळीसगाव) अशी जखमींची नावे आहेत.

शरद काळवणे हे कन्नड येथे मुकाट्याच्या औषधासाठी आले होते. औषध घेतल्यानंतर नातेवाइकांची भेट घेऊन ते घरी परतत होते. दुसरीकडे, ऊसतोड मजूर असलेला मिथुन जाधव हा चाळीसगावकडून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने दुचाकीने जात होता. शरद हे एमएच २० ईएस ६२९८ क्रमांकाच्या, तर मिथुन हे एमएच ५२ ए १५६९ क्रमांकाच्या दुचाकीवरून प्रवास करत होते. दरम्यान, पाणपोई फाटा येथील उड्डाणपुलावर दोन्ही दुचाकींची धडक झाली.

अपघातानंतर दोन्ही जखमींना तत्काळ कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. सोहेल शेख आणि

परिचारिका पौर्णिमा पवार व श्वेता पवार यांनी प्राथमिक उपचार केले. त्यानंतर मिथुन जाधव यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले, तर शरद काळवणे यांना नातेवाइकांनी खासगी रुग्णालयात नेल्याची माहिती मिळाली आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

पाण्याचा काटकसरीने वापर करावा –जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

कालवा सल्लागार समितीची बैठक संपन्न : दारणा प्रकल्पावरील गोदावरी कालव्याच्या पाण्याचे रब्बीत 30 तर उन्हाळ्यात 48 दिवस आवर्तन

शिर्डी, दि; २४(उमाका) धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली असली, तरी लाभक्षेत्रातील नागरिकांच्या व शेतीच्या गरजा लक्षात घेऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे अत्यंत काटकसरीने व योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. सर्वांनीच पाण्याचा वापर काटकसरीने करावा असे आवाहन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

दारणा प्रकल्पावरील गोदावरी कालव्याच्या सन २०२६-२७ मधील रब्बी व उन्हाळी हंगामातील पाण्याचा सुयोग्य वापर व संभाव्य आवर्तनाच्या नियोजनासंदर्भात कालवा सल्लागार समितीची बैठक राहाता येथील कुंदन लॉन्स येथे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या बैठकीत आगामी रब्बी व उन्हाळी हंगामाच्या संभाव्य आवर्तनाचे वेळापत्रक सादर करण्यात आले.

आमदार आशुतोष काळे, आमदार हेमंत ओगले, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, तहसीलदार अमोल मोरे यांच्यासह जलसंपदा विभागाचे अधिकारी, कर्मचारी व लाभधारक शेतकरी उपस्थित होते.

रब्बी व उन्हाळी आवर्तनाचे प्रस्तावित नियोजन

अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने यांनी आवर्तनाच्या संभाव्य नियोजनाची सविस्तर माहिती दिली,

आवर्तनाचे वेळापत्रक आणि नियोजन

यामध्ये रब्बी हंगाम ३० दिवस याचा कालावधी १ डिसेंबर २०२६ ते ३० डिसेंबर २०२६ असून यात पाणी वापर २.६२० टीएमसी असणार आहे.हे सिंचन व बिगर सिंचनासाठी पाणी उपलब्ध असेल. तसेच उन्हाळी हंगाम ३ टप्प्यांत एकूण ४८ दिवस असून यात उन्हाळी हंगामासाठी एकूण ५.१८८ टीएमसी पाणी वापराचे नियोजन केले गेले आहे.यात ३ आवर्तन दिले जाईल यातील.

पहिला टप्पा १ मार्च २०२७ ते २२ मार्च २०२७ (२२ दिवस) – पाणी वापर: २.४३ टीएमसी (मर्यादित सिंचन व बिगर सिंचनासाठी)

दुसरा टप्पा: ५ मे २०२७ ते १७ मे २०२७ १३ दिवस असून पाणी वापर: १.४३ टीएमसी (बिगर सिंचन)

तिसरा टप्पा: १० जुलै २०२७ ते २२ जुलै २०२७ ,१३ दिवस–असून पाणी वापर १.३२८ टीएमसी आहे. या पाणी वाटप नियोजनास कालवा सल्लागार समितीने जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मान्यता दिली.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले की शेतकऱ्यांना विविध कामांसाठी शासकीय कार्यालयांत वारंवार चकरा माराव्या लागू नयेत, यासाठी जलसंपदा विभागाचे कामकाज जलद गतीने आणि ऑनलाइन करण्यावर भर द्यावा . शेतकऱ्यांना त्यांच्या अर्जांची व कामांची माहिती थेट मोबाईलवर उपलब्ध व्हावी आणि विविध डिजिटल सेवा सुलभतेने मिळाव्यात यासाठी प्रशासकीय पातळीवर कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना सांगितले .

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

300 कोटींच्या मल्टीस्टेट घोटाळ्यातील ठेवीदारांना दिलासा!

अनिल बोर्डे यांच्या पाठपुराव्याला यश

गेवराई (प्रतिनिधी) : बीड जिल्ह्यातील भीषण दुष्काळी परिस्थिती असताना मल्टीस्टेट पतसंस्था घोटाळ्यातील सर्वसामान्य ठेवीदारांचे ३०० कोटी रुपये अडकून पडले आहेत. दिवाळी सण तोंडावर आला असताना ठेवीदारांवर उपासमारीची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे उपजिल्हाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी दि. १२ ऑक्टोबर रोजी तहसीलदार गेवराई यांच्याकडे निवेदन देऊन जप्त केलेल्या ३०० कोटींच्या मालमत्तेचा लिलाव दिवाळीपूर्वी करून ठेवीदारांचे पैसे परत द्यावेत, अशी मागणी केली होती.

या मागणीची तात्काळ दखल घेत तहसीलदार गेवराई यांनी दि. २१/१०/२०२६ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांना अधिकृत पत्र पाठवून पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. या पत्राची प्रत जिल्हाधिकारी बीड व उपविभागीय अधिकारी बीड यांनाही पाठवण्यात आली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो ठेवीदारांना दिवाळीपूर्वी पैसे मिळण्याची आशा निर्माण झाली असून, अनिल बोर्डे यांच्या या लढ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दुष्काळाच्या काळोखात स्वयंरोजगाराचा प्रकाश ; शिक्षणासोबत स्वयंरोजगाराचे धडे

पोखरीच्या लोकमान्य टिळक विद्यालयातील मुलींनी बनविले आयुर्वेदिक 'अमृत सुगंधी उटणे'; स्वकमाईतून भागवणार शिक्षणाचा खर्च

अंबाजोगाई : बालवयातच श्रमप्रतिष्ठा आणि स्वावलंबन ही शिकवण भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेने नेहमीच दिली आहे. सध्या ग्रामीण भागात निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती आणि संस्थेच्या अमृत महोत्सवानिमित्त काहीतरी भरीव करता येईल का? या संकल्पनेतून एक आगळा-वेगळा उपक्रम पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत शाळेतील २५ विद्यार्थिनींनी एकत्र येत दिवाळी सणासाठी 'अमृत सुगंधी उटणे' तयार केले आहे. हे उटणे १०० टक्के आयुर्वेदिक असून पूर्णपणे नैसर्गिक घटकांपासून बनविण्यात आले आहे.

दुष्काळामुळे अनेक कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटली असताना या मुलींनी केवळ हातावर हात ठेवून न बसता स्वतःच्या शिक्षणाचा खर्च स्वतः उचलण्याचा निर्धार केला आहे. या उटण्याच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून त्या आपल्या शैक्षणिक साहित्याचा आणि शिक्षणाचा खर्च भागवणार आहेत.

असे आहे 'अमृत सुगंधी उटणे': बाजारातील रासायनिक उटण्यांना फाटा देत, या मुलींनी तयार केलेले उटणे हे आयुर्वेदिक पद्धतीने बनवले आहे. यात नागरमोथा, कापूरकचरी, हळद, बावची, ब्राम्ही, कचोरा,मुलतानमाती, यांचे मऊ मिश्रण करून सुगंधी उटणे तयार केले आहे.याचे वजन २० ग्रॅम आणि किंमत केवळ २० रुपये आहे. सर्वसामान्यांना परवडेल अशी किंमत ठेवण्यात आली आहे.असे ५ हजार ५०० आकर्षक पॉकेट मुलींनी मोठ्या परिश्रमाने तयार केली आहेत.

प्रशिक्षण कुणी दिले?

या विद्यार्थिनींना या कामाचे विशेष प्रशिक्षण शाळेचे मुख्याध्यापक विवेक जोशी, कला शिक्षक राकेश मोरे, आणि लिपिक आनंद गणोरकर यांनी दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींनी उटणे बनविण्याची कृती, त्याचे प्रमाण, पॅकिंग आणि विक्री व्यवस्थापनाचे धडे गिरवले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षात राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना केवळ पुस्तकी शिक्षण नाही तर प्रत्यक्ष जीवनात स्वावलंबी कसे व्हावे याचे धडे मिळाले आहेत. या उपक्रमासाठी केंदीय कार्यकारिणी सदस्या डॉ. कल्पनाताई चौसाळकर, शालेय समितीचे अध्यक्ष आप्पाराव यादव यांचे मार्गदर्शन लाभले. पोखरीच्या या लेकींचा हा उपक्रम संपूर्ण अंबाजोगाई तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

फुले-आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे यांचा वाढदिवस साजरा

परळी (प्रतिनिधी) : फुले-आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते तथा दैनिक पुण्यभूमीचे उपसंपादक इंजि. भगवान साकसमुद्रे यांचा वाढदिवस परळी येथे पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत दिनांक 23 ऑक्टोबर रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी इंजि. भगवान साकसमुद्रे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी मराठवाडा साथीचे कार्यकारी संपादक तथा ज्येष्ठ पत्रकार ओमप्रकाश बुरांडे, परळी प्रहारचे संपादक राजेश साबणे, पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी धनंजय आरबुणे, लोणारवाडीचे सरपंच नवनाथ मुंडे , संपादक नितीन ढाकणे, लक्ष्मण वैराळ सर, पीएलएन न्यूजचे संपादक मुदस्सिर शेख, महेश मुंडे ,आकाश देवरे,पुढारीचे प्रतिनिधी तथा एमएस न्यूजचे संपादक अभिमन्यू फड, न्यूज महाराष्ट्र वनचे श्रीमंत खांडेकर यांच्यासह पत्रकार, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी भगवान साकसमुद्रे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

अंबाजोगाई तालुक्यातील अंजनपूरमध्ये घरफोडी; 55 हजारांचा ऐवज लंपास

अंबाजोगाई : अंबाजोगाई तालुक्यातील अंजनपूर येथे घरफोडीची धक्कादायक घटना समोर आली आहे. लाईट आल्यानंतर शेतात गेलेल्या कुटुंबाच्या घरात घुसून, तीन अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अंजनपूर येथील लक्ष्मण तोकले आणि त्यांचा मुलगा विजय तोकले हे दोघे रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास लाईट आल्याने शेतात मोटार सुरू करण्यासाठी गेले होते. घरी त्यांची पत्नी आणि सून या दोघी घरात असल्याने घराला बाहेरून कुलूप लावून गेले होते. दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास घरात महिला एकट्याच होत्या. याच संधीचा फायदा घेत तीन अज्ञात भामट्यांनी घरात प्रवेश केला. चोरट्यांनी धाक दाखवून महिलेच्या हातातील सोन्याची अंगठी बळजबरीने काढून घेतली आणि कपाटात ठेवलेले दागिने व रोख रक्कम घेऊन पोबारा केला. या प्रकरणी फिर्यादी लक्ष्मण तोकले यांच्या फिर्यादीवरून युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २८४/२०२६ नुसार अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळी पोलिसांनी भेट देऊन पाहणी केली असून पुढील तपास सहाय्यक फौजदार मोरे करत आहेत.

लांबवलेला मुद्देमाल

सोन्याची अंगठी (८ ग्रॅम) - ३२,००० रु. सोन्याचे झुंबर (४ ग्रॅम) - १६,००० रु. चांदीची चैन व जोडवे - २,००० रु. रोख रक्कम - ५,००० रु. एकूण ५,००० रुपयांचा ऐवज. चोरटे चोरी करीत असताना घरातील महिलांनी पाहिले आणि त्या भीतीने मोठ्याने ओरडताच चोरटे पळून गेले. त्यांनी तिघांनीही तोंडाला मास्क लावलेले होते आणि ते तिघेही २० ते २५ वर्ष वयोगटातील होते.

अंजनपूर येथील घरफोडीच्या घटनेच्यातपासासाठी बीड येथील श्वान पथकाला पाचारण करण्यात आले होते. श्वान पथकाची गाडी गावात येताच नागरिकांनी बघण्यासाठी मोठी गर्दी केली होती. श्वान पथकातील प्रशिक्षित श्वानाने घरात आणि घराबाहेर पूर्ण परिसराची झडती घेतली. चोरट्यांनी पळ काढलेल्या दिशेने माग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला.यावेळी घटनास्थळी बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.

आहेरवडगाव श्री तुळजाभवानी देवीच्या यात्रेस आजपासून सुरुवात

बीड : ऐतिहासिक आणि श्रद्धास्थान असलेल्या आहेरवडगाव येथील कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी (जगदंबा) मंदिराला २०० वर्षांचा इतिहास आहे. तुळजाभवानी देवीच्या आराधनेसाठी प्रत्येक भाविकाला तुळजापुरला जाता येत नसल्याने याच ठिकाणी दर्शन व्हावे म्हणून मंदिराची उभारणी २०० वर्षापूर्वी करण्यात आली. दगडी बांधकाम असलेल्या या मंदिरात तुळजाभवानी मातेची काळ्या पाषाणातील मनमोहक मूर्ती आहे. नवरात्रोत्सव आणि कोजागिरी पौर्णिमेच्या काळात देवीला पितळी मुखवटा बसवला जातो. एरवी हा मुखवटा परंपरेनुसार विजयकुमार देशपांडे यांच्या घरातील देवघरात पूजेसाठी ठेवला जातो.

आज रविवार २५ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्त देवीच्या मंदिरात सकाळी साडेसहा वाजता सुरूवातीला देवीचा अभिषेक होणार असुन त्यांनतर सात वाजता भाविकांसाठी अधिकृतपणे दर्शनाला सुरुवात होईल.सोमवार २६ ऑक्टोबर रोजी सकाळी सहा वाजता देवीच्या मुर्तीला पारंपरिक पद्धतीने पंचामृत स्नान व अभिषेक घातला जाईल.सकाळी सात वाजता यात्रेच्या मुख्य कार्यक्रमांना सुरुवात होईल. पालदरा, बार्शीनाका, पाली, समनापूर आणि कोल्हारवाडी येथून भाविक कावड आणतात. त्या कावडींचे स्वागत केले जाणार आहे. मंदिर ट्रस्ट आणि ग्रामस्थांच्या वतीने सर्व भाविकांनी या धार्मिक व सांस्कृतिक सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सोमवारी सायंकाळी ५ वाजता तुळजाभवानी देवीच्या पालखीची मंदिरापासून ते गावातील कल्होळापर्यंत मिरवणूक काढली जाणार आहे.

रोटरीतर्फे 5 गरजू मुलींना सायकलचे वाटप; मुलींनी शिक्षण घेऊन आत्मनिर्भर व्हावे : डीवायएसपी अनिल कटके

वाचन प्रेरणा दिनी 50 पुस्तकांचा संच कन्या शाळेला सुपुर्द

गेवराई ,दि. 23 (प्रतिनिधी)- प्रत्येक मुलींनी आपल्या आई वडिलांनी दिलेली शिकवण मनाशी बाळगून ठेवावी.आहे त्या शाळेत दर्जेदार शिक्षण घ्यावे .शिक्षण घेण्याच्या वेळेत शिक्षणच घ्यावे इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करा. आंतरिक शक्ती वाढवा. मुलींच्या प्रवासाच्या अडचणीचा विचार करून रोटरी क्लब गेवराईने गरजू पाच मुलींना सायकलचे वाटप केले आहे हा खरोखरच स्तुत्य उपक्रम आहे, असे गौरव उद्गार राष्ट्रपती पदक विजेते पोलीस उपविभागीय अधिकारी अनिल कटके यांनी काढले. गेवराई येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत 15 ऑक्टोबर रोजी रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने पाच गरजू मुलींना सायकल वाटप आणि

भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीच्या निमित्ताने वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक विष्णू सोळुंके हे होते तर मंचावर भावी अध्यक्ष राजेंद्र डेंगे, भावी सचिव प्रा. रामप्रभू मुंडे, जेष्ठ सदस्य राधाकिशन लड्डा पब्लिक इमेज संचालक प्रा. राजेंद्र बरकसे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीला रोटरी इंटरनॅशनलचे संस्थापक वॉल हॅरीस क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे स्वागतानंतर संस्थापक अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे यांनी रोटरी क्लब राबवीत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला .डिजिटल क्लासरूम अंतर्गत डिस्ट्रिक्ट 31 32 ने पाठविलेल्या पाच सायकल्स गरजू मुलींना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आल्या तसेच रोटरी क्लबच्या वतीने 50 पुस्तकांचा संच जिल्हा परिषद कन्या प्रशालेला सुपूर्द करण्यात आला. प्रसिद्ध कवी आणि नाट्य अभिनेते प्रशांत रुईकर यांनी वाचना प्रेरणा दिनानिमित्त नाट्यवाचन कसे करावे तसेच शाहीर विलास सोनवणे यांनी कविता कशी वाचावी हे विविध अंगाने सादर केले .कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रकाश साबळे यांनी केले तर आभार प्रा. रामप्रभू मुंडे यांनी मानले .कार्यक्रमास सुप्रसिद्ध निवेदक अशोक गलांडे , व्यवस्थापन समिती अध्यक्ष जवंजाळ, शिक्षक वृंद यांच्यासह रोटरी क्लबचे संचालक ,सदस्य तथा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांसाठी राज्यभर काम करणार : रामा मुळे

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.२४ ऑक्टोबर - जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभर उपक्रम राबविणार असल्याचे रामराज्य ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष रामा मुळे यांनी सांगितले.

मुळे यांच्या वाढदिवसानिमित्त कन्नड तालुक्यातील अंधानेर येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावण्याचा प्रयत्न करण्यात आला.

ग्रामीण भागातील तांडे-वस्त्यांवरील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या अडचणी समजून घेऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविणे गरजेचे आहे. याच उद्देशाने शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम सुरू केला असून, हे पहिले पाऊल असल्याचे रामा मुळे यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजीव जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, डॉ. दिलीपसिंग राजपूत आणि नगरसेवक सुनील पवार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय केवट यांनी केले. यावेळी केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मोतीयाळे, नारायण दांगट, दीपक सोनवणे, राम गुढेकर, सुयश अहिरराव, मच्छिंद्र डिघोळे, मीनाक्षी बडग, आरती बागुल,

महाजन आणि अशफाक शेख यांच्यासह रामराज्य ग्रुपचे सदस्य, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. प्रशांत वाघ यांनी आभार मानले.

कारचा दरवाजा उघडून ६.५५ लाखांचा ऐवज लंपास

बीड (प्रतिनिधी) : बीड शहरासह जिल्ह्यात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे.एकट्या मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावणे, व्यापाऱ्यांच्या बॅगा लंपास करणे, अशा घटनांनंतर आता कारमधून लाखोंचा ऐवज चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. दोन दिवसांपूर्वी बीडच्या जुन्या मोंढा परिसरात व्यापाऱ्याची सुमारे अडीच लाखांची बॅग चोरीला गेल्याची घटना ताजी असतानाच धुळे-सोलापूर महामार्गावर चोरट्यांनी हात साफ केला.

बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आहेर वडगाव फाटा परिसरात २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी कारचा दरवाजा उघडून पर्समधील सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि मोबाईल असा एकूण ६ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रूपसिंह कांता इंदापुर (वय ४९, व्यवसाय शेती, रा. आनंदनगर, धाराशिव) हे देवदर्शनासाठी नाशिककडे जात होते. दरम्यान, आहेर वडगाव फाट्याजवळील तुळजाई रसवंतीगृहासमोर त्यांनी कार रस्त्याच्या बाजूला उभी केली आणि रस पिण्यासाठी गेले. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी कारचा दरवाजा उघडून आतील पर्स चोरून नेली. या पर्समध्ये विविध प्रकारचे सोन्याचे दागिने, ८० हजार रुपये रोख आणि सुमारे १० हजार रुपये किमतीचा मोबाईल होता. रस पिऊन परत कारमध्ये बसताना पर्स चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. परिसरात शोध घेतला, मात्र चोरट्यांचा थांगपत्ता लागला नाही.

या प्रकरणी बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३९५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास ग्रामीण पोलीस करीत आहेत.

बीड शहरासह जिल्ह्यात चेन स्नॅचिंग, रस्त्यावर महिलांचे दागिने हिसकावणे आणि नागरिकांकडील रोकड लुटण्याच्या घटनांमागील टोळीचा पर्दाफाश करून आरोपींना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान बीड पोलिसांसमोर उभे आहे. सातत्याने घडणाऱ्या या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी गस्त वाढवून अशा टोळ्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे. दरम्यान, महामार्गावर कारमधून तब्बल ६ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज लंपास झाल्याच्या या घटनेने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

येडेश्वरीचा ऊसदराचा तिढा सुटला

'येडेश्वरी'ची पहिली उचल 3111 रुपये

केज / प्रतिनिधी : चालू गळीत हंगामातील ऊसदर आणि गतवर्षीच्या थकीत रकमेच्या मागणीवरून सुरू असलेल्या आंदोलनाला येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट्स लि.आनंदगाव (ता. केज) या साखर कारखान्याच्या बाबतीत तोडगा निघाला आहे. शुक्रवारी (दि. २३) कारखान्याचे चेअरमन तथा बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत सुमारे सहा तास झालेल्या चर्चेनंतर सन २०२६-२७ च्या गळीत हंगामासाठी प्रतिटन ३१११ रुपये पहिली उचल देण्याचे मान्य करण्यात आले. तसेच गतवर्षीच्या घोषित दरातील थकीत २०० रुपये दिवाळीच्या पार्श्वभूमीवर टप्प्याटप्प्याने देण्याचे आश्वासन देण्यात आले. या निर्णयानंतर आंदोलक शेतकरी प्रतिनिधींनी येडेश्वरीविरोधातील आंदोलन मागे घेतले आहे.

यंदाचा ऊसदर जाहीर करावा आणि मागील हंगामातील घोषित अंतिम दराची पूर्तता करावी, या मागण्यांसाठी शेतकऱ्यांचे मागील दहा ते बारा दिवसांपासून आंदोलन सुरू होते. यापूर्वी झालेल्या दोन बैठका निष्फळ ठरल्या होत्या. मात्र, शुक्रवारी झालेल्या चर्चेत दोन्ही मागण्यांवर सहमती झाल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. आता थकीत रक्कम प्रत्यक्षात कधी आणि किती टप्प्यांत मिळते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

गंगामाऊलीचा ऊसदराचा प्रश्न प्रलंबित

येडेश्वरीचा प्रश्न मार्गी लागल्यानंतर आता गंगामाऊली शुगर लिमिटेड, उमरी (केज) या कारखान्याच्या व्यवस्थापनानेही शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे आणि संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राहुल खोडसे यांनी केली आहे.

गर्भवतीला तपासणीविनाच घरी पाठवल्याचा आरोप; कन्नड ग्रामीण रुग्णालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह!

पिशोर ग्रामीण रुग्णालयात दुपारी प्रसूती; नातेवाइकांची तक्रार, चौकशी समिती नियुक्त

तभा वृतसेवा

कन्नड :दि.२४ ऑक्टोबर - गर्भवती महिलेला रुग्णालयात दाखल करून घेण्याऐवजी तिची साधी तपासणीही न करता घरी पाठविल्याचा गंभीर आरोप कन्नड ग्रामीण रुग्णालयातील परिचारिकांवर करण्यात आला आहे. त्यानंतर संबंधित महिलेला पिशोर ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून तिला दाखल करून घेतले आणि त्याच दिवशी दुपारी तिची प्रसूती झाली. या प्रकारामुळे कन्नड ग्रामीण रुग्णालयातील रुग्णसेवेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नातेवाइकांनी केली आहे.

सविता निकम वय २३ वर्षे (रा. वासडी) या माहेरी पांडव नगरी येथे आल्या असताना त्यांना त्रास होऊ लागला. त्यामुळे २१ तारखेला सकाळी त्यांना कन्नड ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तेथे परिचारिकांनी तपासणी न करताच त्यांना घरी जाण्यास सांगितल्याचा आरोप त्यांच्या नातेवाइकांनी केला आहे. गर्भवती महिलेला रुग्णालयात दाखल करून घेण्याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सूचना दिल्या होत्या, तरीही परिचारिकांनी तिला दाखल करून घेतले नसल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

कन्नड ग्रामीण रुग्णालयात उपचार मिळतील, या अपेक्षेने आलेल्या कुटुंबाला अखेर दुसऱ्या रुग्णालयाचा आधार घ्यावा लागला. सविता यांना पिशोर ग्रामीण रुग्णालयात खाजगी वाहनाने नेल्यानंतर तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. पटेल यांनी त्यांची तपासणी करून रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर दुपारी त्यांची प्रसूती झाली. कन्नड येथे वेळेत तपासणी व उपचार न मिळाल्याच्या आरोपामुळे रुग्ण आणि नातेवाइकांना मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

‘साधे तपासूनही पाहिले नाही’; मंगल काळे यांचा आरोप

“सविताला त्रास होत असल्याने आम्ही तिला कन्नड ग्रामीण रुग्णालयात घेऊन गेलो. मात्र, परिचारिकांनी साधे तपासूनही पाहिले नाही. धुसफूस करून आम्हाला तेथून काढून दिले. प्रसूतीचा त्रास नसून दुसराच त्रास आहे, असे सांगून घरी जाण्यास सांगितले. त्यामुळे आम्हाला तिला दुसऱ्या रुग्णालयात न्यावे लागले,” असे सविता निकम यांच्या आजी मंगल काळे यांनी सांगितले.

‘चौकशी समिती नेमली आहे’

“या प्रकरणासंदर्भात तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. त्यावर आम्ही चौकशी समिती नेमली असून, चौकशीनंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल.”

— डॉ. दत्ता देगावकर, वैद्यकीय अधीक्षक

या घटनेतील सर्वांत गंभीर बाब म्हणजे गर्भवती महिलेची प्रकृती तपासून आवश्यक वैद्यकीय निर्णय घेण्यात आला होता का, हा प्रश्न आहे. रुग्णाला दाखल करून घेण्याची आवश्यकता असताना तसे का करण्यात आले नाही, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेचे पालन झाले की नाही आणि संबंधित वेळी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची नेमकी भूमिका काय होती, याची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे. आरोपांची सत्यता चौकशीतून स्पष्ट होणार असली, तरी रुग्णसेवेबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे आरोग्य प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

काही दिवसांपूर्वी आरोग्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी (ओएसडी) डॉ. स्वप्नील सांगळे यांनी कन्नड ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली होती. त्या वेळीही रुग्णांच्या नातेवाइकांनी रुग्णालयातील कामकाजाबाबत तक्रारी मांडल्या होत्या. त्यानंतर परिस्थितीत सुधारणा होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. मात्र, गर्भवती महिलेला तपासणीविनाच घरी पाठवल्याचा आरोप समोर आल्याने रुग्णालयातील सेवेत प्रत्यक्षात किती सुधारणा झाली, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शहरातील ग्रामीण रुग्णालयात गर्भवती महिलेला तपासणी व दाखल करून घेण्याबाबत तक्रार होत असताना, पिशोर येथील ग्रामीण रुग्णालयात तिला तपासून दाखल करण्यात आले आणि प्रसूतीही झाली. त्यामुळे या दोन्ही ठिकाणच्या उपचार प्रक्रियेची वस्तुनिष्ठ पडताळणी होणे आवश्यक आहे. शासकीय रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना वेळेत तपासणी, योग्य मार्गदर्शन आणि आवश्यक उपचार मिळणे ही आरोग्य यंत्रणेची जबाबदारी आहे. त्यामुळे या प्रकरणातील तक्रारीची केवळ औपचारिक चौकशी न करता, वस्तुस्थितीच्या आधारे जबाबदारी निश्चित करून दोषी आढळणाऱ्यांवर पारदर्शक कारवाई होणार का, याकडे आता लक्ष लागले आहे.

दुष्काळी परिस्थितीचा गैरफायदा घेणाऱ्या अवैध सावकारांवर होणार कारवाई

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२४ ऑक्टोबर -

जिल्ह्यात दुष्काळामुळे निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन अवैध सावकारांकडून चढ्या व्याजदराने कर्जवाटप करून जबरीने वसुली केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. प्राप्त तक्रारींची प्रकरणनिहाय तपासणी करून अवैध सावकारी करणाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षकांचे प्रतिनिधी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड तसेच सर्व तालुक्यांचे सहायक निबंधक, सहकारी संस्था उपस्थित होते.

बैठकीत प्राप्त तक्रारींचा प्रकरणनिहाय आढावा घेण्यात आला. तक्रारींची तात्काळ पडताळणी करून दोषी आढळणाऱ्या अवैध सावकारांविरुद्ध नियमानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्या. या कारवाईसाठी महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाकडून सहकार विभागास आवश्यक ते सहकार्य उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अवैध सावकारीविरोधात निर्भयपणे तक्रार करा

दुष्काळी परिस्थितीचा गैरफायदा घेऊन कोणताही सावकार चढ्या व्याजदराने कर्ज देत असेल किंवा कर्जाच्या वसुलीसाठी दबाव, धमकी अथवा जबरदस्ती करीत असेल, तर नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या दबावाला किंवा भीतीला बळी पडू नये. अशा प्रकरणांची तक्रार तालुकास्तरावर सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे अथवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांच्या कार्यालयात करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. प्राप्त तक्रारींची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ नुसार पडताळणी करण्यात येऊन, पडताळणीनंतर अवैध सावकारी आढळल्यास संबंधित सावकाराविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

दुष्काळी परिस्थितीत आर्थिक अडचणीत असलेल्या नागरिकांचे अवैध सावकारीपासून संरक्षण करण्यासाठी प्रशासन सज्ज असून, नागरिकांनी अवैध सावकारीच्या घटना निदर्शनास आल्यास तत्काळ प्रशासनाकडे तक्रार करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

किनवट-माहूरमध्ये वाघ-बिबट्यांचा मानवी वस्त्यांकडे मोर्चा; ग्रामीण जनजीवन धोक्यात !

तभा वृतसेवा
किनवट, दि.२४ ऑक्टोबर -

किनवट-माहूरच्या जंगलात वन्यप्राण्यांसाठी पाण्याची पुरेशी व्यवस्था नसल्याने गेल्या महिनाभरापासून वाघ आणि बिबट्यांसारखे हिंस्र वन्यप्राणी नागरी वस्त्यांकडे वळत असल्याचे चित्र समोर येत आहे. पाण्याच्या शोधात मानवी वस्त्यांच्या जवळ येणाऱ्या वन्यप्राण्यांकडून गायी, बैल यांसारख्या पाळीव जनावरांवर हल्ले होत असल्याने शेतकरी आणि पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निमाण झाले आहे. वन्यप्राण्यांची तहान आणि ग्रामीण नागरिकांच्या जिवाची भीती, या दोन्ही प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे, अशी भूमिका आ. भीमराव केराम यांनी मांडली आहे.

किनवट-माहूर परिसर हा विस्तीर्ण जंगल, डोंगररांगा आणि समृद्ध जैवविविधतेसाठी ओळखला जातो. मात्र, वाढते तापमान, पाण्याची घटती उपलब्धता आणि जंगलातील वाळलेला पालापाचोळा यामुळे एकीकडे वनवणव्याचा धोका वाढत आहे, तर दुसरीकडे वन्यप्राण्यांना पाणी मिळविण्यासाठी मानवी वस्त्यांकडे यावे लागत असल्याची चिंताजनक परिस्थिती निर्माण होत आहे. यामुळे वन्यप्राण्यांचे अस्तित्व, शेतकऱ्यांचे पशुधन आणि नागरिकांची सुरक्षितता या तिन्ही बाबी ऐरणीवर आल्या आहेत.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत आ. भीमराव केराम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे पत्राद्वारे तातडीने उपाययोजना करण्याची विनंती केली आहे. वनवणवा रोखण्यासाठी संवेदनशील क्षेत्रांत अग्निरोधक पट्टे तयार करणे, वनकर्मचाऱ्यांची गस्त वाढविणे, आवश्यक अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवणे, तसेच वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासातील अस्तित्वातील पाणवठे कार्यान्वित करून आवश्यकतेनुसार नवीन पाणवठे निर्माण करणे, या उपाययोजनांना प्राधान्य देण्याची भूमिका त्यांनी मांडली आहे.

आदिवासी बांधवांसोबत 'मन की बात' कार्यक्रम

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२४ ऑक्टोबर -

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय 'मन की बात' कार्यक्रमाचे सामूहिक श्रवण हदगाव तालुक्यातील आंदवाडी येवली येथे करण्यात येणार असल्याची माहिती भाजपा हदगाव पूर्व मंडळाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी दिली आहे.

पंतप्रधान मोदी दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी देशवासीयांशी 'मन की बात' च्या माध्यमातून संवाद साधतात. या कार्यक्रमाला देशभरातून प्रचंड प्रतिसाद मिळतो. याच पार्श्वभूमीवर भाजपा कार्यकर्त्यांनी थेट आदिवासी बांधवांच्या वस्तीत जाऊन हा कार्यक्रम ऐकण्याचा संकल्प केला आहे. रविवारी सकाळी ११ वाजता आंदवाडी येवली येथे हा कार्यक्रम होणार असून यावेळी केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती आदिवासी बांधवांना दिली जाणार आहे.

या कार्यक्रमाला तालुक्यातील सर्व पदाधिकारी, बूथ अध्यक्ष, शक्ती केंद्र प्रमुख व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भागवत देवसरकर, डॉ. संदीप करंजकर, बालाजी मेटेवाड यांनी केले आहे.

हदगाव शहरातील नागरिकांनी पाणी बचतीसाठी पुढाकार घ्यावा : मुख्याधिकारी गौरव वांडेकर

तभा वृतसेवा
हदगाव, दि.२४ ऑक्टोबर -

सध्याची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता हदगाव शहरात पिण्याचे पाण्याची टंचाई निमाण होऊ नये याकरिता नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून पाण्याची नासाडी टाळावी, प्रशासनासोबत नागरिकांनी आपली जबाबदारी समजून पाण्याचे अपव्य टाळण्याचे आव्हान हदगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी केले.

घरगुती वापरात पाणी जपून वापरणे, नळांची गळती त्वरित दुरुस्त करणे व मुख्य वितरण पाईपलाईनचे गळती थांबविणे या कामी मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा अभियंता गोविंद सिरसाट, विद्युत अभियंता प्रशांत डोईजड यांच्यासह एक पथक नेमून पाणी गळतीला आळा घालण्याकरिता पथकाने आतापर्यंत उघडे १२० नळाला तोट्या बसविले. वितरण पाईपच्या ४ वॉलची गळती थांबवण्यात आली यासह कोथळा ते हदगाव मेन पाईपलाईनच्या चार एअर हॉलची गळती सुद्धा थांबवली त्याचबरोबर शहरातील १२ आरो फिल्टर प्लांट धारकांना नोटीस देण्यात आले. शहरातील सर्व वार्डात पाणी सोडते वेळी पाणी वाया घालू नये यासाठी सदरील पथकामार्फत जनजागृती सुद्धा करण्यात येत आहे. हदगाव शहरातील वितरण लाईनचे २५ ठिकाणी गळती बंद करण्यात यश आले आहे. पथकामार्फत दररोज शोध मोहीम चालू असून गळती निदर्शनास येताचं पथक ताबडतोब गळती थांबवण्यासाठी सर्व कर्मचारी मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहेत. सार्वजनिक बोरवेलचा सर्वे झाला असून शहरातील ५४ बोरवेल चालू आहेत. काही ठिकाणी बंद असलेल्या मोटार दुरुस्त करण्याची तयारी युद्ध पातळीवर सुरू आहेत सार्वजनिक बोरवेलचे पाणी हे गाडी धुणे, साड्या टाकणे यासाठी चा वापर टाळावे त्याचबरोबर नदीपात्रात पाण्याची पातळी कमी झाल्याने पाण्याचे वापर जपून व काळजीपूर्वक करण्याचे आव्हान मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी केले आहे.

यावर्षी अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचा मोठा खंड पडला त्यातच अत्यल्प पडलेल्या पाण्यामुळे पाण्याची पातळी खालवली आहे .पाणी हा नैसर्गिक साधन संपत्तीचा अमूल्य ठेवा असून त्याचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. त्यामुळेच नळांची गळती थांबून पाण्याची नासाडी टाळावी पाणी गळत असल्यास त्याची त्वरित माहिती प्रशासनाच द्यावी वाहन धुण्याकरिता पाण्याचे अपव्य टाळावे प्रशासनासोबतच नागरिकांनी जबाबदारी समजून पाणी बचतीसाठी पुढाकार घ्यावा पाणी वाचवा भविष्य घडवा उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि जलस्तोत्रांचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. आज प्रत्येक नागरिकांनी पाणी बचतीचा संकल्प केला तर भविष्यातील पाणीटंचाईचा धोका कमी करण्यासाठी निश्चितच मदत होऊ शकते असे मत मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांनी व्यक्त केले.

चारा साक्षरता अभियानांतर्गत निकृष्ट चारा सकस करण्याचे प्रात्यक्षिक

नांदेड-जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी उपलब्ध चाऱ्याचा शास्त्रीय व कार्यक्षम वापर करण्याच्या उद्देशाने चारा साक्षरता अभियानांतर्गत मौजे सोमेश्वर, ता. जि.नांदेड येथे शेतकरी व पशुपालकांना वाळलेल्या सोयाबीन कुटारावर युरिया-गुळ-मीठ प्रक्रिया करून निकृष्ट चारा सकस करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यावेळी हिरवा व वाळलेला चारा कडबाकुट्टी यंत्राद्वारे वापरणे, निकृष्ट चारा सकस करणे, मुरघास निर्मिती, अझोला, हायड्रोपोनिक्स तसेच चाऱ्याची नासाडी टाळून उपलब्ध चाऱ्याचा कार्यक्षम वापर करण्याबाबत, जनावरांचा विमा ई. बाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. डि.आर. बचंटी, पशुधन पर्यवेक्षक दत्ता लबडे तसेच परिसरातील शेतकरी व पशुपालक उपस्थित होते. संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी उपलब्ध चाऱ्याचे पोषणमूल्य वाढविणे, चाऱ्याची नासाडी टाळणे व पशुधनासाठी सकस चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करणे. यासाठी हे प्रात्यक्षिक करण्यात आले.

मायक्रो फायनान्स कंपनीच्या सक्तीची वसुली थांबविण्यासाठी निवेदन

आदमपूर-बिलोली तालुक्यातील भुमीहिन शेतमजुर गोर गरीब व्यक्ती संदर्भात मायक्रो फायन्स कंपनीकडून विविध उपयोगासाठी गतकाळी अर्थसहाय्य घेतले आहे.परंतु, सध्या महाराष्ट्रासह तालुक्यातही कोरड्या दुष्काळाची गंभीर परिस्थिती समोर येऊन उभी ठाकल्याने सदरील कंपनीकडून घेतलेले ८ दिवसांचे व १६ दिवसांचे आणि १ महिण्यांचे मायक्रो फायनांन्सचे हफ्ते भरण्यास सध्याची परिस्थिती अनुकूल नसल्यामुळे हाताला काम नाही, कोणतेही रोजगार नाही त्यामुळे पोट भरणे अवघड झाले आहे.त्यात मायक्रो फायनान्स व इतर फायनान्स चे हाफ्ते भरणे कठीण झाले आहे.त्या संदर्भात शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर रोजी सगरोळी येथील सामाजिक कार्यकर्ते नागेश दिगांबर माचापुरे यांच्यावतीने उपविभागीय अधिकारी कार्यालय बिलोली येथे निवेदन देण्यात आले आहे. सद्यस्थितीत हाताला काम धंदे लागल्यानंतर आम्ही मायक्रो फायनान्सचे हाफ्ते भरु शकतो.त्यामुळे मेहरबान साहेबांनी वरील फायनान्सचे हाफ्ते भरण्यास तात्पुरती स्थगिती व सक्तीची वसुली करु नये,असे आदेश देण्यात यावेत. तालुक्यातील भुमीहीन शेतमजुराला रोजगार हमीचे कामे काढावेत कारण,सध्या दीपावलीचा सण आहे. जेणेकरून दिवाळीचा उत्सव साजरा करता यावा.सदरील निवेदन बिलोली तहसीलदार साहेब व पोलीस निरीक्षक बिलोली यांच्याकडे प्रतिलिपीत सादर करण्यात आले आहे.

दीपकनगरमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात

नांदेड-शहरातील दीपकनगर येथील सारनाथ बौद्ध विहारात ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त भगवान गौतम बुद्ध यांच्या शांतता, समता, बंधुता आणि मानवतेच्या संदेशाचे स्मरण करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवून आणलेल्या धम्मक्रांतीच्या विचारांना उजाळा देत समताधिष्ठित समाजनिर्मितीचा संकल्प व्यक्त करण्यात आला.यावेळी अलका देवके, सूर्यकांता लोणे, सुमनबाई भवरे, मीरा सूर्यवंशी, ललिता वाठोरे, चंद्रकला इनायते, कमलबाई आळणे, छाया गोदणे, सुजाता कदम, वच्छला नरवाडे, आशा कांबळे, अम्रपाली गोवंत, कुसुम खंदारे, मीरा नरवाडे, रमा कांबळे, वंदना नरवाडे आणि शांताबाई कांबळे यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

कागदपत्रे हरवली आहे

माझे राजश्री हरी राठोड माऊली नर्सिंग कॉलेज नांदेड चे MNC रजिस्ट्रेशन मूळ महत्वाचे कागदपत्रे बस प्रवासादरम्यान हरवली आहे. ज्यांना कोणास सापडल्यास त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता - विजय नगर नांदेड
मोबाईल नंबर- ७४९८१३४१५६

डॉ. शंकरराव चव्हाणांमुळे मराठवाड्याची तहान भागली: आ. अॅड. श्रीजयाताई चव्हाण

तभा वृतसेवा
अर्धापूर, दि.२४ ऑक्टोबर -

या वर्षी महाराष्ट्र दुष्काळाने होरपळत असून सर्वांनी पाणी अत्यंत जपून वापरणे गरजेचे आहे. दिवंगत नेते कै. शंकरराव चव्हाण साहेबांच्या दूरदृष्टीमुळे आणि इसापूर-जायकवाडी धरणासारख्या मोठ्या प्रकल्पामुळेच आज तहानलेल्या मराठवाड्याची तहान भागू शकली. असे गौरवोग्दगार आ. अॅड. श्रीजयाताई चव्हाण यांनी पिंपळगाव महादेव येथे काढले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक सेवाकार्याला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने देशभरात राबवल्या जात असलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत नांदेड येथील जयप्रकाश ग्राम कल्याण संस्था संचलित 'निर्धार व्यसनमुक्ती केंद्रा'च्या वतीने पिंपळगाव येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना आमदार अॅड. श्रीजयाताई चव्हाण यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल कु. राजनंदिनी दुधमल आणि महेश व्यंकटी कल्याणकर यांचे त्यांनी विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन स्वतःमधील कौशल्यांचा विकास करावा, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष राम अय्यर यांनी व्यसनमुक्ती केंद्राच्या कार्याची माहिती देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाचा आढावा घेतला. भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुभाषराव कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यास गावातील प्रतिष्ठित नागरिक सौ. सारिका कल्याणकर, प्रवीण देशमुख, सुरेश देशमुख, अजय कल्याणकार, वसंतराव कल्याणकर, नागोराव भांगे पाटील, बालाजी गव्हाणे, माधवराव कल्याणकर , मुख्याध्यापक इंगोले, अहंकारे सर यांच्यासह शिक्षकवृंद, पालक आणि हजारो विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर सर्व मान्यवरांनी 'निर्धार व्यसनमुक्ती केंद्रा'स आ.श्रीजया चव्हाण यांनी सदिच्छा भेट देऊन चालवल्या जाणाऱ्या सामाजिक उपक्रमांबद्दल समाधान व्यक्त केले. सोहळ्याचे उत्कृष्ट सूत्रसंचालन भगवान साळवे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीकांत निळेकर, संकेत अय्यर, वंदना सावते, आनंदराव शिंदे, रामगिरवार आणि सचेतन अय्यर यांनी विशेष परिश्रम घेतले.

सहसरकार्यवाह आलोक कुमार यांच्या उपस्थितीत आज संघाचा विजयादशमी उत्सव

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२४ ऑक्टोबर -

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त नांदेड येथे विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अखिल भारतीय सहसरकार्यवाह श्री. आलोक कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.४५ वाजता यशवंत महाविद्यालयाच्या प्रांगणात हा उत्सव होणार आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ मध्ये विजयादशमीच्या दिवशी झाली. संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर देशभरात विविध कार्यक्रम व अभियानांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून नांदेडमध्ये पारंपरिक विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सव साजरा करण्यात येणार आहे.

या उत्सवाला नागरिकांनी सहकुटुंब मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नांदेड शहर संघचालक डॉ. गोपाल राठी यांनी केले आहे.

अजबच! मुलाच्या शाळा प्रवेशानंतर तब्बल ११ वर्षांनी घेतला वडीलांनी शाळेत प्रवेश

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२४ ऑक्टोबर -

बनावट टी.सी.च्या आधारे शासनाची दिशाभूल करून शासनाकडून लाखो रुपये वेतन उकळणाऱ्या जिल्हा परिषदेच्या मुखेड लघु पाटबंधारे उपविभागीय कार्यालयातील पहारेकरी म दिगंबर लक्ष्मण अभंगे यांचा आणखी एक बनावटपणा उघड झाला असून मुलाच्या शाळेच्या प्रवेशानंतर तब्बल ११ वर्षांनी त्यांनी शाळेत प्रवेश घेतल्याचे कागदपत्रावरून उघड झाले असल्याने दिगंबर अभंगे यांनी शासनाची फसवणूक केल्याची सिद्ध होत असून त्यांच्यावर कारवाई करून त्यांच्या त्यांना देण्यात आलेले वेतन वसूल करावे अशी मागणी ऍड. अमोल पुरी यांनी केली आहे.

जिल्हा परिषदेच्या मुखेड लघुपाटबंधारे उप विभागात पहारेकरी म्हणून कार्यरत असलेले दिगंबर लक्ष्मण अभंगे यांनी बनावट टी.सी. च्या आधारे शासनाची दिशाभूल करून लाखो रुपये वेतन उचलले असल्याने याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी ऍड. अमोल पुरी यांनी केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने दैनिक तरुण भारत मध्ये यापूर्वी देखील वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार दिगंबर लक्ष्मण अभंगे यांनी मुलगा ज्ञानेश्वर अभंगे यांच्या शाळा प्रवेशानंतर तब्बल अकरा वर्षांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंगनाळी या ठिकाणी प्रवेश घेतल्याचे प्रवेश निर्गम उताऱ्यावर नमूद आहे. ज्ञानेश्वर अभंगे यांनी २५ जुलै १९७७ मध्ये शाळेत प्रवेश घेतला तर त्याचे वडील दिगंबर अभंगे यांनी जवळपास ११ वर्षांनी म्हणजेच १ ऑगस्ट १९ ८९ मध्ये शाळेत प्रवेश घेतला. एवढेच नव्हे तर दिगंबर अभंगे ९ वर्षाचे असताना त्यांना पुत्रप्राप्ती झाल्याचे देखील कागदपत्रावरून उघड होत आहे. दिगंबर अभंगे यांची जन्म तारीख १२ एप्रिल १९६८ तर केवळ नऊ वर्षानंतर म्हणजेच २५ जुलै १९७७ रोजी त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर यांचा जन्म झाल्याचे प्रवेश निर्गम उताऱ्यावर नमूद आहे.

शासनाची फसवणूक करण्याचा दिगंबर अभंगे यांचा फंडा उघड

त्यामुळे खोट्या कागदपत्राच्या आधारे दिगंबर अभंगे यांनी वर्षानुवर्ष शासनाची फसवणूक केली असून या प्रकरणाची तातडीने चौकशी करावी तसेच त्यांच्याकडून शासनाने अदा केलेले वेतन वसूल करून घ्यावे अन्यथा न्यायालयात जाण्याचा इशारा ऍड. अमोल पुरी यांनी दिला आहे.

दुष्काळग्रस्तांच्या बांधावर आ. चिखलीकर; सहा गावांत पाणी-चाऱ्याचा घेतला आढावा

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२४ ऑक्टोबर -

दुष्काळाच्या झळांनी शेतकरी आणि ग्रामस्थ होरपळत असताना त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी लोहा-कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी माळाकोळी गटातील सहा गावांचा दौरा केला. गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी मुरंबी, आष्टूर, हरणवाडी, रिसनगाव, लव्हरळ आणि रामतीर्थ या गावांना भेटी देत त्यांनी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, जनावरांच्या चाऱ्याची स्थिती आणि दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेत त्यांना धीर दिला.

ग्रामस्थांशी संवाद साधताना, खचून जाऊ नका, धीर धरा; सरकार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास आमदार चिखलीकर यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार दुष्काळ निवारणासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी, चारा आणि गावोगावच्या समस्यांबाबत ग्रामस्थांशी चर्चा करून आवश्यक उपाययोजनांसाठी प्रयत्न करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

मुरंबी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून त्यांनी हनुमान मंदिरात ग्रामस्थांशी संवाद साधला. हरणवाडी येथील श्री संत सद्गुरू बाळूमामा मंदिरात दर्शन घेतले. रिसनगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून ग्रामस्थांची भेट घेतली. आष्टूर येथे महादेव मंदिरात दर्शन घेऊन स्वामी शंकरानंद भारती बाबा आश्रमाला भेट दिली. रामतीर्थ येथे रामलिंग महाराज यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. लव्हरळ येथे देविदासराव देशमुख यांच्या निवासस्थानी ग्रामस्थांशी संवाद साधला.

या दौऱ्यात पंचायत समितीचे माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे ढाकणीकर, लोहा नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी उपसभापती रोहित पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रमुनी मस्के, माजी नगरसेवक रमेश माळी, हनुमंत धुळगंडे, बाळू पाटील बाबर यांच्यासह संबंधित गावांतील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोयाबीन खरेदीतील शेतकऱ्यांची कथित लुट थांबवा : बालाजी बच्चेवार

तभा वृतसेवा
नायगाव, दि.२४ ऑक्टोबर -

दिवसरात्र शेतात राबून, निसर्गाच्या लहरीपणाशी दोन हात करत आणि असंख्य संकटांचा सामना करून शेतकरी आपल्या शेतात सोयाबीनचे पीक उभे करतो. मात्र, हातात आलेल्या पिकाची विक्री करताना वजनाच्या नावाखाली अतिरिक्त कपात होत असल्यास शेतकऱ्यांच्या कष्टाच्या कमाईवरच घाला घातला जातो. सोयाबीन खरेदीतील कथित दोन किलो कट्टीचा प्रकार तातडीने थांबवून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा माजी जिल्हा परिषद सदस्य बालाजी बच्चेवार यांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील शेतकरी प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत सोयाबीनचे पीक पदरात पाडून घेत आहेत. उत्पादन खर्च, शेतीसाठी घेतलेले कर्ज, मजुरी आणि इतर खर्चांचा डोंगर समोर असताना शेतकऱ्यांची संपूर्ण आशा हाती आलेल्या पिकावर असते. अशा वेळी सोयाबीन विक्रीच्या व्यवहारातच वजनाच्या नावाखाली कपात होत असल्याची तक्रार समोर येणे ही शेतकऱ्यांसाठी चिंतेची बाब आहे. एकीकडे शेतीचा वाढता खर्च आणि दुसरीकडे विक्रीच्या वेळी होणारी कथित अतिरिक्त कपात, अशा दुहेरी संकटात शेतकरी भरडला जात असल्याचे बच्चेवार यांनी निवेदनात नमूद केले आहे.

सोयाबीन खरेदी करताना पोत्यासह ५० किलो ८०० ग्रॅम वजनाची पद्धत लागू करण्याची मागणी असताना, प्रत्यक्ष व्यवहारात ५२ किलोच्या भरतीवर दोन किलो कट्टी लावली जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. काही ठिकाणी ५२ किलो २०० ग्रॅम वजनाच्या आधारे खरेदी होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या पद्धतीमुळे प्रत्येक पोत्यामागे शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे नुकसान होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. एका पोत्यामागील कपात किरकोळ वाटत असली, तरी अनेक पोत्यांची विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांच्या एकूण हिशेबावर त्याचा परिणाम होऊ शकतो. शेतकऱ्यांच्या कष्टाच्या प्रत्येक दाण्याचा हिशेब पारदर्शकपणे व्हावा, हीच या मागणीमागील भूमिका आहे.

या प्रकाराची गंभीर दखल घेऊन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांच्यामार्फत जिल्ह्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांना स्पष्ट लेखी आदेश द्यावेत. शेतकऱ्यांकडून नियमबाह्य कट्टी घेतली जाणार नाही, याची खात्री करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यापारी आणि आडतदारांवर संबंधित कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी बच्चेवार यांनी केली आहे. याशिवाय, जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये निर्धारित वजनासंबंधी माहिती देणारे फलक लावावेत, तक्रार निवारणासाठी हेल्पलाइन सुरू करावी आणि संपूर्ण जिल्ह्यात सोयाबीन खरेदीची एकसमान पद्धत लागू करावी, असेही त्यांनी सुचविले आहे.

शेतकऱ्यांच्या घामाला मोल मिळाले पाहिजे, त्यांच्या कष्टाच्या उत्पादनातील प्रत्येक दाण्याचा योग्य हिशेब झाला पाहिजे आणि बाजारपेठेत त्यांची आर्थिक पिळवणूक होणार नाही, याची जबाबदारी प्रशासनाने गांभीर्याने पार पाडली पाहिजे. सोयाबीन खरेदीतील कथित अतिरिक्त कट्टीच्या तक्रारींची तातडीने चौकशी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा आणि त्यांच्या हक्काचे नुकसान रोखण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी बालाजी बच्चेवार यांनी केली आहे.

अग्रलेख

‘फॉक्स’च्या अहवालातील इशारा

गेल्या काही वर्षांत जग खूप जवळ आले आहे. जवळ येण्याचा अर्थ दोन देशांतील भौगोलिक अंतर कमी झाले असा घ्यायचा नसतो. अत्याधुनिक संपर्क व्यवस्था, तंत्रज्ञानाने तसेच दळणवळणाच्या साधनांनी जगाला जवळ आणले आहे, असा त्याचा अर्थ होतो. ‘कर लो दुनिया मुठ्ठी में’ अशी एका मोबाईल कंपनीची जाहिरात होती. आता जवळपास तसेच झाले आहे. एका देशातील पर्यावरण आणि हवामानाचा दुसऱ्या देशावर सहज परिणाम होतो. कधी हा परिणाम अनुकूल असतो तर कधी प्रतिकूल, पण काही ना काही परिणाम होतोच. एका देशात वादळी पाऊस आला तर दुसऱ्या देशात गारवा निर्माण होतो, एका देशात बर्फवृष्टी झाली की दुसऱ्या देशात थंडी पडते. आता तर एका देशात आंदोलन सुरू झाले की त्याची धग शेजारील देशांतही पोहोचते. या संदर्भात युरोपचे ताजे उदाहरण आपल्यासमोर आहे. अशा आंदोलनांचे जे लोण इतर देशांत पोहोचते, त्यात काही न काही कार्यकारणभाव असतो. एका आंदोलनाचा थेट दुसऱ्या आंदोलनाशी संबंध नसला तरी त्यात काही अदृश्य धागेदोरे असतात. फ्रान्समध्ये सुरू असलेल्या आंदोलनाचा भारतात सुरू असलेल्या तरुणांच्या आंदोलनाशी संबंध आहे, असे म्हटले तर त्यावर सहजासहजी कोणाचा विश्वास बसणार नाही. पण ही वस्तुस्थिती असल्याचे आता उघड झाले आहे.

अलिकडेच झालेल्या फ्रान्समधील आंदोलनाला हिंसाचाराचे गालबोट लागले. भारतातील आंदोलनातही सुरुवातीला हिंसाचार झाला होता, पण सुदैवाने सरकारच्या सतर्कतेने आणि तातडीने केलेल्या उपाययोजनांमुळे तो लगेच आटोक्यात आला. त्याचे लोण देशाच्या अन्य भागांत पोहोचले नाही. फ्रान्समध्ये तसे झाले नाही. तेथील हिंसाचाराचा वणवा देशभर पसरला आणि तो तेथील सरकारला अजूनही पूर्णपणे आटोक्यात आणता आला नाही. अशात हा अहवाल आला आहे आणि फ्रान्समध्ये हिंसक रूप घेतलेले तरुणांचे आंदोलन आणि भारतातील तरुणांचे आंदोलन याचा संबंध आहे, असे त्यात सांगितलेले आहे. देशात कुठेही अशांतता निर्माण झाली तर त्यात बाह्य शक्तींचा हात असल्याचा आरोप केला जात होता. हा आरोप निराधार आणि नाहक केलेला नसायचा तर त्यात काही तरी तथ्य असायचे, याची ताज्या घटनाक्रमाने खात्री पटू लागली आहे आणि या अहवालाने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे.

भारत आणि फ्रान्समध्ये, विशेषतः युरोपातील काही देशांत सुरू असलेल्या आंदोलनांमागे, ९ देशांतील शंभरावर इस्लामी आणि साम्यवादी संघटना असल्याचा खळबळजनक दावा अमेरिकेतील फॉक्स न्यूज डिजिटल इन्व्हेस्टिगेशनच्या अहवालातून करण्यात आला आहे. या अहवालाकडे कुणालाही दुर्लक्ष करता येणार नाही. ज्या देशात शांतता आहे, जे देश प्रगतिपथावर आहेत, ज्यांची आर्थिक प्रगती वेगाने होत आहे, तेथे असंतोष निर्माण करणे हे काही विघ्नसंतोषी वृत्तीच्या लोकांचे काम असते. अशी वृत्ती अनेक संघटनांत आणि काही वेळेला देशांमध्येही असते. उदाहरणार्थ पाकिस्तानला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात झालेली भारताची प्रगती सहन होत नाही. त्यामुळे कोणत्या तरी मार्गाने भारतात अस्थिरता निर्माण करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न असतो. भारतात घातपाती आणि दहशतवादी कारवायाही घडवून आणायला पाकिस्तान मागेपुढे पाहत नाही, हे आतापर्यंत अनेकवेळा सिद्ध झाले आहे. सोबतीला आणखी काही शेजारी या ना त्या प्रकारे असतात, हेही आपण पाहिले आहे. गेल्या काही वर्षांत सर्वत्र तरुण पिढीत असंतोष वाढत आहे. त्याला भारत अपवाद नाही. या असंतोषाचा फायदा उचलत अस्थिरता निर्माण करण्याचे षडयंत्र सुरू असल्याचे फ्रान्समध्ये आणि नंतर युरोपातील काही देशांत दिसले. फ्रान्सशिवाय, स्पेन, इटली, पोर्तुगाल आणि अल्बानिया आदी देश हिंसाचाराच्या लाटेत होरपळून निघत आहेत. युरोपातील अनेक देशांतील हिंसक दंगलींचा समन्वय, संघटन आणि विस्तार करण्याचे म्हणजे त्याला खतपाणी घालण्याचे काम तिकडच्या शंभरावर इस्लामी संघटना तसेच साम्यवादी संघटना करत असल्याचा अहवाल या पृष्ठभूमीवर धक्कादायक ठरतो. भारतातील घटनाक्रमाशी या कारस्थानाचा संबंध आहे. इंडियन अलायन्स पॅरिस (आयएपी) ही फ्रान्समधील संघटना फ्रान्स आणि भारतातील देशविघातक चळवळींना एका सूत्रात जोडण्याचे काम करीत असून, मॅनहॅटनमधील पीपल्स फोरम ही संघटना या कामात हातभार लावत असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. कोणत्याही गोष्टीला पैसा लागत असतो. फ्रान्स तसेच युरोपातील देशातील हिंसाचार घडवणाऱ्या असामाजिक संघटनांना शांघायमधील अमेरिकी वंशाचे उद्योगपती नेव्हिल रॉय सिंघम हे वित्तपुरवठा करत असल्याचा आरोपही या अहवालातून करण्यात आला आहे. याच संदर्भात पॅरिसमधील भारतीय वंशाचे जॉय बॅनर्जी यांचे नावही या अहवालात असून, त्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे. फ्रान्स तसेच युरोपातील काही देशांत जशी परिस्थिती आहे, तशी परिस्थिती सुदैवाने भारतात निर्माण झालेली नाही. फ्रान्स आणि युरोपातील अन्य देशांत तेथील सरकारविरोधात जेवढा असंतोष आहे, त्या तुलनेत भारतातील असंतोषाचे प्रमाण मर्यादित आहे. सरकार कुणाचेही असले तरी जनतेत राजी-नाराजी असतेच. तशी ती भारतातही थोडीफार असणारच. पण, आगडोंब उसळावा, अशी स्थिती भारतात नाही हे नक्की. फ्रान्स आणि युरोपातील देशातील खालावलेली शिक्षणव्यवस्था, रोजगाराच्या संधीत होत असलेली घट, महागाई तसेच ढासळती अर्थव्यवस्था या कारणांमुळे सर्वसामान्य माणसाचे जगणे कठीण झाले आहे. वाढते कर्ज आणि त्यावरील व्याजामुळे या देशात कल्याणकारी योजनांवरील खर्चात सातत्याने कपात होत आहे. या परिस्थितीचा फायदा इस्लामी आणि साम्यवादी संघटनांनी घेतला नसता तरच नवल होते. दुर्दैवाने राष्ट्रहिताच्या दृष्टीने या आंदोलनांकडे पाहणे अद्याप भारतातील सरकारच्या विरोधकांना जमले नाही. त्यामुळे इस्लामी तसेच साम्यवादी संघटनांच्या घातक मनसुब्यांना आपल्या देशातील विरोधी पक्ष अप्रत्यक्षरीत्या खतपाणी घालत आहेत, असे म्हटले तर वावगे ठरू नये. काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडी, डाव्या संघटना तसेच कॉक्रोच जनता पार्टीसारखी संघटना विदेशी शक्तींचे हस्तक झाल्यासारखे वागत आहेत, ही चिंताजनक बाब म्हटली पाहिजे. वास्तवात फ्रान्स आणि युरोपातील हिंसाचारग्रस्त देशांतील राजवटी तसेच भारतातील मोदी सरकार यांच्यात कार्यक्षमता, गुणवत्ता आणि लोकप्रियतेच्या बाबतीत जमीन-अस्मानचा फरक आहे. मोदी सरकारने गेल्या बारा वर्षांत लोककल्याणाच्या जेवढ्या योजना राबवल्या, त्यांची बरोबरी युरोपातील हे सारे देश मिळूनही करू शकत नाही. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांसोबत शिक्षण आणि आरोग्यसेवा यांतही मोदी सरकारने दिलासादायक कामगिरी केली आहे. तरीही मोदी सरकारविरुद्ध जनतेत प्रचंड असंतोष आहे, असे वातावरण निर्माण करण्याचा काही शक्तींचा प्रयत्न आहे. त्याला अद्याप यश आलेले नाही आणि येणारही नाही. देशात दंगली घडवण्याचा, अस्थिरता निर्माण करण्याचा शंभरावर इस्लामी तसेच साम्यवादी संघटनाचा प्रयत्न फ्रान्स आणि युरोपातील काही देशांत यशस्वी होताना दिसत असला तरी भारतात तो कदापि यशस्वी होऊ शकणार नाही. कारण भारतीय जनतेचे पहिले प्रेम मातृभूमीवर आहे. या मातीशी ही जनता कधीच विश्वासघात करू शकत नाही. वेळप्रसंगी भारतीय जनता एकवेळ अर्धपोटी राहील, फाटक्या कपड्यात वावरेल, पण देशाची एकता आणि अखंडता कदापि धोक्यात येऊ देणार नाही. त्यामुळेच भारताकडे वाकडी नजर करण्याची आतापर्यंत कोणाची हिंमत झाली नाही. कोणी तशी हिंमत केली तर त्याला धडा शिकवण्याची हिंमत भारतीयांमध्ये आहे. पण, राष्ट्रप्रेमाला सावधगिरीची साथ आवश्यक असते, हेही लक्षात ठेवले पाहिजे. देशाचे शत्रू ओळखण्यात चूक होता कामा नये! ■

प्रासंगिक

भारताची कृषिगाथा : परिवर्तनाचे दशक

शिवराज सिंह चौहान

माननीय पंतप्रधानांनी २०१४ साली ज्यावेळी कार्यभार स्वीकारला, त्यावेळी कृषी आणि शेतकरी कल्याणाला भारताच्या विकासाच्या अजेंड्याच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले. २०१५ पासून, यासाठीची कटिबद्धता सातत्याने आणि अधिकाधिक जोरकसपणे प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त होऊ लागली, मग त्यात उत्पादन आणि कृषी उत्पन्न वाढवण्यापर्यंतचे व्यापक परिवर्तन असो किंवा मग कृषी क्षेत्राला अधिक उत्पादनक्षम, टिकून राहणारे, तंत्रज्ञान-प्रणीत आणि शाश्वत बनवण्यासाठीचे प्रयत्न असोत, यांचा समावेश होता. पंतप्रधानांनी सातत्याने, एका गोष्टीवर भर दिला आहे, तो म्हणजे, “विकसित भारतासाठी, कृषी क्षेत्राचा विकास अनिवार्य आहे.” त्याशिवाय, भारताने केवळ, आपल्या अन्नाच्या गरजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे पुरेसे नाही, तर, जगाचा अन्नधान्य पुरवठादार म्हणूनही भारताने पुढे यायला हवे, असे आवाहन त्यांनी केले आहे. लालबहादूर शास्त्री यांच्या ‘जय जवान, जय किसान’ या घोषणेत अटलबिहारी वाजपेयी यांनी घातलेली ‘जय विज्ञान’ची भर, त्याला पंतप्रधानांनी देशाला, ‘जय अनुसंधान’ अशी आणखी एक जोड दिली. या घोषणेसोबतच, त्यांनी संशोधन आणि नवोन्मेष याला भारताच्या कृषी क्षेत्राच्या भविष्याच्या केंद्रस्थानी ठेवले.

अन्न सुरक्षा ते कृषी क्षेत्रातील आमूलाग्र परिवर्तनापर्यंत : या दूरदृष्टीमागे, आपण कृषी क्षेत्राकडे कशाप्रकारे बघायला हवे, यासाठीचे एक निर्णायक परिवर्तन होते. हरितक्रांतीने भारताला अन्नसुरक्षा दिली. आज मात्र आपली जबाबदारी पोषण सुरक्षा, शेतकऱ्यांची समृद्धी, संसाधन सुरक्षा आणि जागतिक स्पर्धात्मकता या सगळ्यांचा भक्कम पाया तयार करणे ही आहे. भारताच्या कृषिक्षेत्राचा प्रवास ही एक अत्यंत लक्षणीय अशी उपलब्धी आहे. एकेकाळी अन्नधान्यासाठी आयातीवर अवलंबून असणारा भारत, केवळ काही दशकांत, मूलभूत आहाराच्या डाळींच्या उत्पादनात स्वयंपूर्ण ठरला. हरितक्रांतीला, विज्ञान, उत्तम दर्जाची सुधारित बियाणे, सिंचन, पायाभूत सुविधा, संस्थात्मक पतपुरवठा व्यवस्था, विस्तार आणि धोरणात्मक पाठबळ, अशा सर्व घटकांचे पाठबळ मिळाले.

व्यापक कृषी विकासाचे दशक

आणि म्हणूनच, २०१५ पासून सुरू असलेले कृषी क्षेत्रातील हे परिवर्तन लक्षणीय आहे. भारतीय कृषी क्षेत्राच्या इतिहासात, वर्ष १९९५-९६ आणि वर्ष २०१४-१५ ही संरचनात्मक बदलाची वर्षे समजली जातात. कारण, कृषी क्षेत्राच्या उन्नतीत, हा काळ अत्यंत महत्त्वाचा टप्पा समजला जातो. पहिल्या टप्प्यावर आर्थिक उदारीकरण, बाजारपेठांचे अधिकाधिक एकत्रीकरण, उपभोगाच्या बदलत्या पद्धती आणि डाळींच्या उत्पादन वाढीत आलेली मंदी, अशा सगळ्या घटकांचे प्रतिबिंब आढळते. तर, दुसरा टप्पा, अधिक वैविध्य असलेला, तंत्रज्ञानयुक्त, बदलत्या परिस्थितीत तग धरू शकेल, अशी कृषी सिंचन विस्तारित कृषी पद्धती, डिजिटल प्लॅटफॉर्म, बाजारपेठेत सुधारणा आणि शाश्वतता तसेच हवामान बदलाच्या परिस्थितीशी जुळवून घेणारी कृषी व्यवस्था विकसित करण्यावर सातत्याने दिलेला भर, अशी सगळी वैशिष्ट्ये असलेला म्हणता येईल.

भारत सरकारने या परिवर्तनासाठी आवश्यक असलेली महत्त्वपूर्ण यंत्रणा यापूर्वीच उभी केली आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाण्याच्या कार्यक्षम वापराला प्रोत्साहन देत आहे. मृदा आरोग्य पत्रिका उपक्रमामुळे माती परीक्षण आणि संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापनाला शेतीविषयक निर्णयप्रक्रियेत केंद्रस्थानी स्थान मिळाले आहे. प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा आणि उत्थान महाभियान (पीएम-कुसुम) योजनेद्वारे शेतीचा संबंध अक्षय ऊर्जेशी जोडला जात आहे. शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) शेतमालाचे एकत्रीकरण आणि शेतकऱ्यांची व्यावहारिक आणि सौदा करण्याची क्षमता सक्षम करत आहेत. ई-नामच्या माध्यमातून कृषी बाजारपेठा डिजिटल स्वरूपात जोडल्या जात आहेत, तर कृषी पायाभूत सुविधा निधी, प्रधानमंत्री किसान संपदा योजना आणि प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना संघटित स्वरूप देण्याची योजना (पीएमएफएमई) या सगळ्याद्वारे पीक काढणीनंतरच्या पायाभूत सुविधा आणि कृषी प्रक्रिया क्षेत्राला बळकटी दिली जात आहे.

या परिवर्तनात तंत्रज्ञानाची भूमिका मध्यवर्ती असेल. भारतीय कृषी संशोधनाने केवळ उत्पादनवाढीचे पारंपरिक उद्दिष्ट ओलांडून प्रगती केली आहे. २०१४ ते २०२५ या कालावधीत पिकांच्या ३,२३६ नवीन जाती विकसित करून प्रसारित करण्यात आल्या, तर २००३ ते २०२४ या कालावधीत ही संख्या १५,४० इतकी होती.

प्रयोगशाळेपासून ते शेवटच्या घटकापर्यंत

आज संशोधन आणि विस्ताराची भूमिका, आधीपेक्षाही अधिकाधिक महत्त्वाची ठरली आहे. कृषी संशोधनात गुंतवलेला प्रत्येक रुपया अत्यंत भरीव असे वित्तीय परतावे देतो, तर विस्तारामुळे, वैज्ञानिक ज्ञानाचे रूपांतर शेतीमध्ये प्रत्यक्ष सुधारणा करण्यात झाले आहे. आपण आपल्या प्रयोगशाळा, कृषी विज्ञान केंद्रे, स्टार्ट अप्स, खाजगी नवोन्मेषक आणि शेतकरी यांच्यातील संबंध अधिक दृढ करणे आवश्यक आहे. त्याचवेळी, आपण संसाधनांच्या आव्हानांचाही सामना करायला हवा. भारत कायमच, पाणी, खते, ऊर्जा आणि भूमी यांच्या वापरायचा विस्तार करून आपले कृषी उत्पादन वाढवू शकत नाही. भूजल पातळी खाली जाणे, जमिनीची धूप, हवामानात होणारे बदल आणि त्यामुळे होणाऱ्या प्रतिकूल घटना, या सगळ्यांचा विचार करता, उत्पादनाच्या पद्धतीत आमूलाग्र बदल करणे ही काळाची गरज आहे.

पाण्याचा, अन्नद्रव्यांचा आणि ऊर्जेचा प्रत्येक घटक कार्यक्षमतेने वापरण्यास प्रोत्साहन देणारी धोरणे आपण आखली पाहिजेत. हवामान बदलांना तोंड देऊ शकणाऱ्या पिकांच्या जाती, पाणी आणि अन्नद्रव्यांचा कार्यक्षम वापर करणारी पिके, मातीतील जैविक घटकांमध्ये सुधारणा, एकात्मिक कीड व्यवस्थापन, संवर्धनात्मक शेती आणि अचूक शेती पद्धती यांना संशोधनात प्राधान्य दिले पाहिजे. डाळी आणि तेलबिया पिकांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे, कारण या पिकांची उत्पादकता वाढवणे हे भारताचे पोषणविषयक आणि आर्थिक स्वावलंबन अधिक बळकट करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

प्रभावी बाजारपेठा आणि जागतिक मूल्य साखळी

एक शेतकरी, जेव्हा अत्यंत कार्यक्षमतेने पिकांचे उत्पादन घेतो, तो आपला माल लोकांना, नफा कमवून विकणेही त्याला शक्य व्हायला हवे. कृषी बाजारपेठा, साठवणूक, शीतसाखळी, रसद व्यवस्था, प्रतवारी, प्रक्रिया उद्योग आणि डिजिटल मंच यांचा विकासही कृषी उत्पादनवाढीच्या बरोबरीने झाला पाहिजे. कृषी उत्पादनात झालेली वाढ आणि नाशवंत शेतमालाच्या उत्पादनातील विविधीकरण यांमुळे शेतमालाचे कार्यक्षम एकत्रीकरण आणि बाजारपेठांशी सुलभ जोडणी यांची गरज वाढली आहे.

भारतात, जागतिक पातळीवर गुणवत्तेसाठी, मागोवा घेणे, सुरक्षितता आणि ब्रँडिंग अशा सगळ्यासाठी नावाजली जातील, अशी कृषी उत्पादने विकसित करणे, ही आपली महत्त्वाकांक्षा असायला हवी. त्यामुळे पुढचा टप्पा, शेतकऱ्यांना केवळ देशांतर्गत ग्राहकांशी जोडणे हा नाही, तर कृषी मूल्य साखळीशी जोडणे, हा असायला हवा. यातून, रोजगारनिर्मिती होईल, ग्रामीण उद्यमशीलतेला प्रोत्साहन मिळेल आणि कृषीतून निर्माण झालेल्या मूल्याचा मोठा वाटा, ग्रामीण भारतात राहील. मात्र हे परिवर्तन, केवळ केंद्र सरकार एकट्याने घडवू शकत नाही. कृषी क्षेत्र ही सामाईक जबाबदारी आहे. राज्य सरकार, स्थानिक प्रशासन, संशोधन संस्था, कृषी उत्पादक संघटना, सहकारी संघटना, खाजगी उद्योगक्षेत्र, वित्तीय संस्था आणि नागरी समाज अशा सर्वांनी एकत्रित काम करायला हवे.

‘विकसित कृषी’ ते ‘विकसित भारत’ हा प्रवास केवळ किती टन उत्पादन झाले, यावरून मोजला जाणार नाही, तर आपल्या शेतकऱ्यांच्या जीवनमानात किती सुधारणा झाली, यावरून त्याचे मूल्यमापन केले जाईल. ‘आपण किती उत्पादन करू शकतो?’ या प्रश्नापलीकडे जाऊन ‘आपण किती कार्यक्षमतेने, शाश्वत पद्धतीने आणि फायदेशीररीत्या उत्पादन करू शकतो?’ या प्रश्नाकडे आत्मविश्वासाने वाटचाल करण्याची गरज आहे.

हरितक्रांतीने भारताच्या अन्नसुरक्षेचा पाया भक्कम केला. आता पुढील कृषी परिवर्तनाने भारताची समृद्धी, पोषणसुरक्षा, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि जागतिक नेतृत्व सुनिश्चित केले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला स्पष्ट दिशा दिली आहे : भारतीय कृषी क्षेत्र हे विकसित भारताचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनले पाहिजे. विज्ञान, नवोन्मेष, पायाभूत सुविधा, बाजारपेठा आणि संस्था यांच्या माध्यमातून या दृष्टिकोनाचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर करणे हे आपले कर्तव्य आहे. आणि या सर्व प्रक्रियेत भारतीय शेतकऱ्याला प्रत्येक कृषी धोरणाच्या केंद्रस्थानी ठेवणे सर्वांत महत्त्वाचे आहे.

(लेखक, भारत सरकारचे कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री आहेत. लेखात व्यक्त केलेली मते त्यांची वैयक्तिक मते आहेत.) ■

यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

देश सुरक्षित राहणे गरजेचे

आज जगाकडे पाहिले की एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की शांतता ही आता गृहीत धरता येणारी गोष्ट राहिलेली नाही. “रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, फ्रान्सचा प्रश्न, सुदानमधील गृहयुद्ध, पूर्व काँगोतील सशस्त्र हिंसा आणि साहेल प्रदेशातील दहशतवादामुळे जागतिक अस्थिरता वाढली आहे.” ग्लोबल पीस इंडेक्सच्या २०२५ अहवालानुसार जगात ५९ सक्रिय राज्याधारित संघर्ष सुरू होते आणि २०२४ मध्ये संघर्षांमुळे झालेल्या मृत्यूंची संख्या १.५२ लाखांवर पोहोचली होती. जगभरातले हे असे दूषित वातावरण पाहिले की आपल्याला प्रश्न पडतो की इतक्या मोठ्या, विविधतेने नटलेल्या आणि प्रांत व सीमांनी वेढलेल्या देशात तुलनेने स्थैर्य कसे टिकून आहे?

२०१४ नंतर केंद्र सरकारने दहशतवाद, सीमापार घुसखोरी, नक्षलवाद आणि अंतर्गत हिंसा याकडे कठोर दृष्टिकोनातून पाहिले आहे. सुरक्षा, गुप्तचर यंत्रणा आणि राजनैतिक दबाव यांचा व्यवस्थित वापर केला आहे. सरकारी आकडेवारीनुसार २००४-१४ या दशकातील ७,२१७ दहशतवादी घटनांच्या तुलनेत २०१४-२४ या काळात २,२४२ घटना घडल्या आहेत. यामध्ये नक्षलवादाचे उदाहरण अधिक बोलके आहे. नक्षलवाद संपवणे म्हणजे बंदूकधारी नक्षलींना ठार मारणे इतका साधा हा प्रश्न नाही. उलट दुर्गम भागातील प्रशासनाचा अभाव, जनतेमध्ये पसरलेली भीती, सरकारी यंत्रणेविरुद्ध प्रचार आणि विकासाच्या अभावावर उभा राहिलेला सशस्त्र दहशतवाद असा खूपच व्यापक प्रश्न होता. त्यामुळे या प्रश्नाला वेगळ्या पद्धतीने हाताळण्याची गरज होती व मोदी सरकार यात यशस्वी झाले आहे. २०१० मध्ये नक्षली हिंसेच्या १,९३६ घटना घडल्या आणि १,००५ नागरिक व सुरक्षाकर्मी मृत्युमुखी पडले. २०२४ मध्ये ३७४ घटना आणि १५० मृत्यू झाले, असे केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अहवालात नमूद आहे. पुढे २०१५ च्या राष्ट्रीय धोरणात सुरक्षा कारवाईसोबत रस्ते, मोबाईल नेटवर्क, बँकिंग, शाळा आणि आरोग्यसेवा यावर भर देण्यात आला. म्हणजे बंदुकीला बंदुकीने उत्तर देतानाच नागरिकांना शासनाच्या मदतीचा हातही मिळाला.

आता शहरी नक्षलवादाकडे वळूया. हे खरंय की सरकारला प्रश्न विचारणाऱ्यांना शहरी नक्षल असं लेबल लावता येत नाही. त्याचबरोबर सरकारच्या कामाने संतुष्ट झालेल्या लोकांना अंधभक्तही म्हणता येत नाही. मात्र लोकशाहीच्या नावाखाली हिंसेचे समर्थन करणे, फुटीरतावादी किंवा माओवादी अजेंडा पुढे रेटणे, खोट्या माहितीच्या आधारावर समाजात द्वेष पसरवणे आणि परकीय हिंसक नेटवर्कशी संबंध ठेवणे; हे गंभीर प्रश्न आहेत. अशा प्रवृत्तींना कायद्याचा धाक असणे आवश्यक आहे. अर्थात तपास यंत्रणा आणि पोलिसांनी कर्तव्य पार पाडल्यानंतर खरी परीक्षा न्यायालयात असते. अजमल कसाबने लोकांची हत्या केली हे सर्व जगाने पाहिले. पण त्याला फासावर लटकवायला ४ वर्षे लागली. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रिया ही पूर्णपणे वेगळी असते हे आपण समजून घेतले पाहिजे. असो!

२०१४ नंतर देशात सीएएविरोधी आंदोलन, शाहीन बाग, शेतकरी आंदोलन, अग्निपथविरोधी आंदोलन आणि अलिकडील कॉक्रोच जनता पार्टीसारखी चळवळ दिसली. आता कॉक्रोच्या माध्यमातून सतत आंदोलनांचे आयोजन करण्यात येत आहे. क्षुल्लक कारणावरून इतकी आंदोलने देशात घडत राहिली तर देश प्रगतिपथावर कसा जाणार? नेपाळ, बांगलादेश, श्रीलंका हे आपल्या शेजारील उदाहरण आहे. जगभरातल्या अनेक देशांत तर प्रचंड अस्वस्थता आहे. शांततेत आंदोलन करण्याचा नागरिकांचा अधिकार मान्य केला, तरी आंदोलनासाठी कायदेशीर नियम, सार्वजनिक सुव्यवस्था आणि पोलिसांच्या परवानगीसंबंधीच्या अटींचे पालन करणे आवश्यक आहे. दिल्ली पोलिसांनी १२ ऑक्टोबर रोजी जंतरमंतरला अधिसूचित आंदोलनस्थळाच्या यादीतून वगळल्याचे सांगितले. त्याऐवजी रामलीला मैदान, बुराडी मैदान आणि पूर्व दिल्लीतील सीबीडी मैदान ही तीन पर्यायी ठिकाणे निश्चित करण्यात आली. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. पुन्हा ही न्यायालयीन प्रक्रिया झाली. पण सामान्य जनतेच्या नजरेतून तार्किकदृष्ट्या पाहायला गेले, तर आंदोलनात कोणतीही असंवैधानिक गोष्ट घडू नये, ही आंदोलनकर्त्यांचीच जबाबदारी असायला हवी. ‘‘हर घर और हर गली बनेगी जंतर-मंतर’’ हा प्रकार म्हणजे देश पेटवण्याचे उघड कारस्थान आहे. इथे गुजरात दंगलीचा मुद्दा निघाला की राजकारण तापतं. नरेंद्र मोदींनी त्यावेळेस राजधर्माचे पालन केले आणि गुजरातच्या जनतेचे सरक्षण केले.

इतिहासाकडे डोकावून पाहिले तर १९६७ चे नक्षलबारी उदाहरण लक्षात घ्यायला हवे. सुरुवातीला ते भूमिहीन शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उभे राहिलेले आंदोलन होते; पण पुढे सशस्त्र क्रांतीच्या विचारधारेने त्याला हिंसक वळण दिले गेले. प्रश्न न्याय्य असला तरी पद्धत हिंसक झाली की समाज जळतो. आणि नंतर तो समाज पुन्हा उभा राहू शकत नाही किंवा त्यास अनेक वर्षे खर्च करावी लागतात. आंदोलनादरम्यान सरकारला दुहेरी भूमिका निभवावी लागते. एकतर आंदोलनकर्त्यांचे म्हणणे न्याय्य असेल ते ऐकून घेणे आणि आंदोलन हिंसक झाले तर ते परिस्थितिजन्य अशा लोकशाही मार्गाने शमवणे. मोदी सरकारच्या काळात भारताने ही दोन टोकं जोडण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र काही ठिकाणी सरकारला माघार घ्यावी लागली आहे. हा राजकारणाचा आणि सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा असू शकतो. सीमापार दहशतवादाला प्रत्युत्तर, नक्षलग्रस्त भागात सुरक्षा आणि विकास किंवा आणखी काही प्रकरणांची हाताळणी असेल, या सगळ्यामध्ये भारत अनेक युद्धग्रस्त देशांच्या तुलनेत अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम दिसतो. लक्षात घ्या, देश सुरक्षित ठेवणे म्हणजे विरोधकांना गप्प करणे असा त्याचा अर्थ होत नाही; तर विरोधालाही संविधानाच्या चौकटीत सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे! तरच लोकशाही टिकून राहते आणि या कसोटीवर भारताने गेल्या दशकात जगातील अनेक अस्थिर देशांपेक्षा निश्चितच चांगली कामगिरी केली आहे. मात्र आंदोलनकर्ते आणि अराजकतावादी यांच्यामुळे सामान्य नागरिकांना होणारा त्रास पाहिल्यास शासनाला थोडसे कठोर होणे गरजेचे आहे. प्रक्रियेमध्ये अजून थोडा बदल करणे गरजेचे आहे. ‘‘थोडा है थोडे की जरुरत है!’’ असे असले तरी आपण सुरक्षित आहोत. थोडक्यात सांगायचे झालं तर, ‘‘मोदी है तो सेफ है’’ असे म्हटल्यावर लोक तुम्हाला अंधभक्त वगैरे म्हणतील. पण ‘‘बोलने दे, तकलीफ हुआ हैं बिचारे को’’ असे म्हणत त्याकडे दुर्लक्षच करायला हवे. कारण देश सेफ राहणे अत्यंत गरजेचे आहे. ■

writerjayeshmestry@gmail.com

मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

प्रश्न पत आणि पात्रतेचा!

महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःला मराठी माणसाचे तारणहार म्हणवून घेणाऱ्या अनेक नेत्यांच्या दांभिकतेचे बुरखे आता टराटरा फाटू लागले आहेत. विचारधारेचा अभाव, सततची धरसोड वृत्ती आणि क्षुल्लक राजकीय स्वार्थासाठी मराठी तरुणांच्या भावनांशी खेळण्याचा प्रदीर्घ इतिहास असलेल्या या पक्षांची आणि त्यांच्या नेत्यांची खरे तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बोलण्याची पात्रता नाही. मात्र, स्वतःचे महत्त्व वाढवून घेण्यासाठी, फुटेज खाण्यासाठी अशी नौटंकी एक नेता अधूनमधून करत असतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या शतकी वाटचाल करणाऱ्या, अहोरात्र राष्ट्रकार्यासाठी झटणाऱ्या आणि शिस्तबद्ध समाजसंघटना उभारणाऱ्या संस्थेवर गरळ ओकण्यापूर्वी स्वतःच्या बुडाखालचा अंधार त्यांनी आधी बघावा आणि नंतरच इतरांकडे बोट दाखवावे, हे श्रेयस्कर.

केवळ भावनिक घोषणा, निष्पाप कार्यकर्त्यांच्या डोक्यावर पोलिसांच्या गुन्ह्यांचा भार असे पराक्रम करून मराठी माणसाला वाऱ्यावर सोडण्याचेच राजकारण यांच्याकडून सतत घडले आहे. त्यामुळे आज जेव्हा संघविचारांवर आणि हिंदू अस्मितेवर हा नेता प्रश्न उपस्थित करतो, तेव्हा- साहेब, तुमचा खरा चेहरा कोणता आणि तुमचा मूळ अजेंडा तरी काय, असा प्रश्न विचारावासा वाटतो. काकांचे बोट धरून राजकारणात आलेल्या राज ठाकरे साहेबांना आपले काका हिंदुहृदयसम्राट होते, याचाही विसर पडलाय्!

नव्वदच्या दशकात मराठी तरुणांना उद्योजक बनवण्याचे स्वप्न दाखवून काय केले गेले, हे महाराष्ट्र विसरलेला नाही. मुंबईत मायकल जॅक्सनचा कॉन्सर्ट आयोजित करण्यात आला होता. तत्कालीन शिव उद्योग सेनेच्या माध्यमातून हजारो मराठी तरुणांनी आणि पालकांनी त्या कार्यक्रमाची महागडी तिकिटे खरेदी केली. कारण त्यातून गोळा होणारा कोट्यवधींचा निधी राज्यातील बेरोजगार तरुणांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवल म्हणून दिला जाईल, असे सांगण्यात आले होते. त्या कार्यक्रमाला आज तीन दशके उलटून गेली, पण त्या वेळी संकलित झालेला तो निधी नेमका कुठे गेला आणि त्यातून किती मराठी पोरांच्या हातांना रोजगार मिळाला, किती जणांचे प्रपंच मार्गी लागले, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

अशाच नेत्यांनी माथी भडकवल्यामुळे हजारो निष्पाप मराठी तरुणांवर दंगली, तोडफोड आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हे दाखल होत असतात, हा इतिहास आहे. यांच्या स्वार्थासाठी आक्रमक झालेले असंख्य तरुण आजही न्यायालयांच्या फेऱ्या मारत आहेत, अनेकांचे करीअर उद्ध्वस्त झाले आहे. अनेक तरुण पश्चात्तापग्रस्त झालेले आहेत. एके काळी साहेब-साहेब म्हणून नेत्यांच्या मागे फिरणाऱ्या आणि नेत्यांच्या शब्दावर वाट्टेल ते करणाऱ्या या तरुणांसाठी या नेत्यांनी नंतर काहीही केले नाही. कधी मराठी माणूस, कधी विकासाची पोकळ ब्लू प्रिंट, कधी मोदींचे समर्थन, तर कधी विरोध; पुन्हा अचानक हिंदुत्वाची शाल पांघरूण भोंग्यांचे राजकारण आणि निवडणुका जवळ आल्या की पुन्हा सोयीस्कर तडजोडी अशा सततच्या कोलांटउड्यांमुळे तशीही राज साहेबांची विश्वासार्हता प्रश्नांकित झालेली आहे. असाच दुटप्पीपणा पालघरमध्ये जेव्हा दोन निष्पाप साधूंची निर्घृण हत्या करण्यात आली, तेव्हाही दिसला. देशासाठी सुवर्ण जिंकणाऱ्या मराठी खेळाडूला भेटायला साहेबांना वेळ नसतो. लोक विचारतात- नेमके करतात तरी काय साहेब? म्हणे, ‘बदल आवश्यक आहे. हाफ पॅन्टची फुल नाही का झाली, त्यामुळे रिजिम चेंज झालीच पाहिजे...’ इंग्रजी भाषेत एक वाक्य आहे- ‘‘बी द चेंज यू वाँट टू सी इन द वर्ल्ड’’. अर्थात जो बदल आपल्याला पाहायचा किंवा घडवायचा असतो, त्याची सुरुवात स्वतःपासून करावी लागते. राज साहेब, रिजिम चेंजची सुरुवात तुमच्या पक्षापासून कधी बरं करताय, असा प्रश्न त्यांना विचारावासा वाटतो. तुमच्या जागेवर दुसऱ्या कुणाला तरी द्या की संधी, पक्षप्रमुख म्हणून. तुमच्या ज्येष्ठ बंधूंना पण सांगा की पक्षप्रमुखपदाची संधी दुसऱ्या कुणाला दे म्हणून! होतेय् का बघा रिजिम चेंज...? नाही ना? तुमच्या पक्षाचा निर्णय तुम्ही घेणे समजू शकतो. लोकशाहीत सत्तांतराचा निर्णय घेण्याचा अधिकार नागरिकांना असतो. कुण्या एकट्याला नाही! पण, यातले काहीही अशा नेत्यांच्या ध्यानी येत नाही. त्यामुळे ते वाट्टेल तसे बरळत असतात.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल राज ठाकरे यांनी केलेली वक्तव्ये त्यांच्या वैचारिक स्तराचे दर्शन घडविणारी आहेत. ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेली १०० वर्षे अविरतपणे, कोणत्याही प्रसिद्धीच्या हव्यासाविना, केवळ समाज आणि राष्ट्र उभारणीसाठी आपले आयुष्य समर्पित केले, त्या संघावर टीका करण्याची त्यांची पात्रता नाही. संघाचे स्वयंसेवक जेव्हा काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पूर, भूकंप, चक्रीवादळ अशा राष्ट्रीय आपत्तींच्या वेळी स्वतःचा जीव धोक्यात घालून लोकांच्या मदतीला धावून जातात, तेव्हा तिथे जात, पात किंवा भाषा-प्रांत पाहिला जात नाही. स्वातंत्र्यानंतर राजकीय विरोध, खोट्या चौकशा आणि बंदी सहन करूनही संघाने कधीही राष्ट्रविरोधी किंवा हिंसक मार्ग पत्करला नाही. उलट संघाने नेहमीच लोकशाहीच्या चौकटीत राहून समाज जोडण्याचे काम केले. एकीकडे एका शतकाची निःस्वार्थी, तळागाळातील समाजसाधना करणारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारखी संघटना आणि दुसरीकडे केवळ भावनिक भाषणबाजी, प्रांत-भाषावाद आणि स्वार्थी वृत्ती, अशी ही विसंगती कुणाच्याही लक्षात यावी. तरीही, ज्यांच्या कारनाम्यांमुळे असंख्य तरुण अडचणीत आले, त्यांनी मराठी अस्मितेचा ढोल बडवायचा यापेक्षा दुसरा हास्यास्पद प्रकार असू शकत नाही. स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी, स्वतःचे राजकीय अस्तित्व कायम ठेवण्यासाठी राज ठाकरेंना महाराष्ट्राच्या जनतेने आता चांगल्या पद्धतीने ओळखले आहे. पारखून घेतलेले आहे. आता तरी राजसाहेबांनी आत्मपरीक्षण करावे.

आपण काकांच्या पक्षातून बाहेर पडून काय तीर मारले, याचा अंदाज घ्यावा. जमल्यास आपल्या ‘महाराष्ट्रव्यापी’ पक्षाचे आमदार-खासदार-नगरसेवक यांचा हिशेब मांडून पाहावा. आपण तरुणांना आणि महाराष्ट्राच्या जनतेला दिलेली आश्वासने स्मरून पाहावीत. राजकारण आणि समाजकारण असेच होत नसते. एखाद्या समाजसेवी संघटनेवर टीकाटिप्पणी करण्याची पात्रता येण्यासाठी किमान आपला पक्ष तरी नीट आणि सबळ असावा लागतो. तो तसा नाही, हे साऱ्यांनाच ठावूक असेल तर त्या पक्षाच्या प्रमुखालाच ठावूक नाही असे कसे म्हणता येईल? राजसाहेबांनी अशी उथळ विधाने करण्यापेक्षा स्वतःचा आणि पक्षाचा आलेख उंचावला पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संघटनेवर टीकाटिप्पणी करून सत्तांतर होणार नाही आणि त्यांचा पक्षही वाढणार नाही. शेवटी प्रश्न पत आणि पात्रतेचा असतो. या दोन्ही गोष्टी मिळवाव्या लागतात आणि त्यासाठी फार कष्ट उपसावे लागतात. त्यांना हेही समजले पाहिजे की, लोकतांत्रिक देशात सत्तांतर होणे स्वाभाविकच असले तरी ते निवडणुकीतूनच होणे अपेक्षित आहे. तसे भारतात आणि महाराष्ट्रातही अनेकदा झालेले आहे. रस्त्यावरच्या मोर्चांवरून आणि अशा वक्तव्यांवरून सत्तांतरे व्हायला लागली तर लोकतांत्रिक व्यवस्था आणि निवडणूक प्रक्रिया गुंडाळून ठेवावी लागेल. ■

९२७०३३३८८६

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

संक्षिप्त...

निलंगा नगर परिषदेतर्फे विद्यार्थ्यांसाठी इकोफ्रेंडली दिवाळी मार्गदर्शन सत्र

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २४ ऑक्टोबर : माजी मंत्री लोकनेते आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, निलंगा नगर परिषद अंतर्गत जिल्हा परिषद मुलांची प्रशाला व जिल्हा परिषद कन्या प्रशाला येथे दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी इकोफ्रेंडली दिवाळी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्रात डॉ. गीतांजली कौशिक यांनी पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच श्री. योगेश चव्हाण यांनी दुष्काळाच्या पार्श्र्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर आणि पाणी बचतीचे महत्त्व पटवून दिले. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांना पाणी बचतीची शपथ देण्यात आली.

पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुरेश होळकर, पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता श्रीमती प्रज्ञा पाटोळे, जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती एस. नागमोडे आणि श्री. गौतम सातपुते यांची विशेष उपस्थिती होती.

पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करूया, पाण्याचा प्रत्येक थेंब जपूया आणि हरित निलंगाच्या निर्मितीस हातभार लावूया

औशात मंगळवारी १३१ व्या आग्गी सोहळ्याचे आयोजन
स्वामी निवासस्थान ते विरभद्रेश्वर मंदिरापर्यंत भव्य मिरवणूक

तभा वृत्तसेवा

औसा दि. २४ ऑॅक्टोंबर : २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही संस्कृती, परंपरा आणि आग्गी सोहळा आजही तेवढ्याच श्रद्धेने औसा शहरात टिकून आहे.ओसा शहरातील वीरभद्र मंदीरात गेल्या १३१वर्षापासून ते आजपर्यंत अखंडपणे सुरू असलेला सोहळा रामलिंग सातलिंग स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली अलोक रामलिंग स्वामी करीत असून या पारंपरिक आख्खी सोहळ्याचे आयोजन मंगळवार दि. २७ रोजी सायंकाळी ६वा. करण्यात आले आहे.

संताची भूमी म्हणून ओळख असलेल्या औशात अनेक पारंपरिक पद्धतीने सोहळा साजरा करण्यात येतो. अशी औसा शहराची २१व्या शतकातही नवी ओळख आहे. स्वातंत्रपुर्व काळापासून सुरू असलेली परंपरा आजही तेवढ्याच भक्ती भावाने, श्रद्धेने सुरू आहे.आज या परंपरेची पाचवी पिढी असून १३१ वर्षापासून अखंडपणे सुरू आहे.

इरय्या स्वामी यांनी सुरू केलेला आग्गी सोहळा आजही सुरू असून .मृगय्या स्वामी,बसय्या स्वामी,सातलिंग स्वामी यांनी अखंडपणे सुरू ठेवला होता. यानंतर रामलिंग स्वामी यांनी आपल्या पाचव्य पिढीत अखंडपणे अद्वितीय,अदभूत असा सोहळा पारंपारिक पद्धतीने सुरू ठेवला आहे.

इतर सोहळ्याप्रमाणे आग्गी सोहळा अखंडितपणे सुरू ठेवणे साधी, सोपी आणि सहज होणारी गोष्ट नाही.यासाठी मोठा त्याग, श्रध्दा, भक्ती गरजेची असते. आणि स्वामी परिवाराच्या वतीने गेल्या पाच पिढ्यांपासून जपवणूक केली आहे.यावर्षी रामलिंग सातलिंग स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि.२७ रोजी स्वामी यांच्या निवासस्थानापासून ते वीरभद्रेश्र्वर मंदीर परिसरातून नगरप्रदक्षिणा वाजत गाजत होणार आहे.

दुपारच्या सत्रात महाप्रसाद होणार आहे.तर सायंकाळी ६ वाजता आग्गी सोहळा साजरा करण्यात येणार आहे.

अग्नीच्या कोळशावरून चालण्याची परंपरा या वर्षी रामलिंग स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली अलोक रामलिंग स्वामी वैज्ञानिक दृष्टिकोनातून पुर्ण करणार आहेत. भाविक भक्तांनी महाप्रसाद व आग्गी सोहळ्याचा लाभ घ्यावा. असे आवाहन स्वामी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

पुणे–लातूर दिवाळी स्पेशल रेल्वे सुरू करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : लातूर-मुंबई रेल्वेस मुरुड रेल्वे स्थानकावर थांबा मिळाल्याबद्दल रेल्वे संघर्ष समिती, मुरुड यांच्या वतीने खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पुणे-लातूर दिवाळी स्पेशल रेल्वे सुरू करण्यासह रेल्वेच्या विविध प्रलंबित प्रश्र्नांबाबत त्यांना निवेदन देण्यात आले.

मागील वर्षी मध्य रेल्वेच्या वतीने लातूर-पुणे दिवाळी स्पेशल रेल्वे सुरू करण्यात आली होती. या गाडीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. पुणे शहरात लातूर व धाराशिव जिल्ह्यातील अनेक नागरिक रोजगार, नोकरी आणि शिक्षणाच्या निमित्ताने वास्तव्यास आहेत. दिवाळी सणासाठी आपल्या गावी येणाऱ्या नागरिकांची आणि विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते.

मात्र सणासुदीच्या काळात खासगी ट्रॅव्हल्सच्या तिकीटदरात दुप्पट-तिप्पट वाढ होत असल्याने सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांना प्रवास करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. रेल्वे प्रवास तुलनेने कमी खर्चिक आणि सुरक्षित असल्यामुळे पुणे येथे राहणाऱ्या लातूर व धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांसाठी पुणे-लातूर दिवाळी स्पेशल रेल्वे सुरू करावी, अशी मागणी रेल्वे संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली.

दिवाळीत ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी विशेष तपासणी मोहीम राबवा
ग्राहक संरक्षणचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २४ ऑक्टोबर : दिवाळीच्या सणात मिठाई, सुका मेवा, फराळ आणि पॅकबंद खाद्यपदार्थांच्या विक्रीत ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी लातूर जिल्ह्यात विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य तथा लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेचे मराठवाडा समन्वयक संग्राम वाघमारे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सदरील निवेदनात दिवाळीत खाद्यपदार्थांचे वजन, दर्जा, उत्पादन व वापराची मुदत आणि छापील किंमतीबाबत ग्राहकांची दिशाभूल होण्याची शक्यता असून मुदतबाह्य वस्तूंची विक्री तसेच एमआरपीपेक्षा अधिक दर आकारण्याचे प्रकार वाढू शकतात. ते रोखण्यासाठी वैध मापनशास्त्र विभाग आणि अन्न व औषध प्रशासनाने संयुक्त तपासणी मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पुढे पॅकबंद वस्तूंवरील उत्पादकाचे नाव, निव्वळ वजन, उत्पादनाचा महिना व वर्ष, कमाल, किरकोळ किंमत आणि ग्राहक तक्रार निवारणाची माहिती तपासावी. तसेच खाद्यपदार्थांचा दर्जा, स्वच्छता, साठवणूक व अन्नसुरक्षेच्या नियमांची पडताळणी करून ग्राहकांसाठी तक्रार नोंदविण्याचे दूरध्वनी क्रमांक आणि ई-मेल प्रसिद्ध करावेत, असे म्हटले आहे. तपासणीतील अनियमितता आणि त्यावरील कारवाईचा आढावा घेऊनच

दिवाळीपूर्वीच प्रभावी उपाययोजना करून ग्राहकांना सुरक्षित, दर्जेदार खाद्यपदार्थ योग्य किंमतीत उपलब्ध करून द्यावेत, असे आवाहनही लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेने केले आहे.

या निवेदनावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे नूतन सदस्य तथा लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेचे पदाधिकारी संग्राम वाघमारे, किशन धुळशेट्टे, अविनाश सवई, विशाल कणसे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

चाकूर तालुका कृषी कार्यालयात गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी वॉशरूम जाम तर शौचालय घाण
महाराष्ट्रात गुटखा बंदी मग कर्मचाऱ्यांना गुटखा भेटतो कोठून ?

तभा वृत्तसेवा /सतिश गाडेकर

चाकूर दि. २४ ऑक्टोबर : महाराष्ट्रात गुटखा, पानमसाला विक्री, साठवणूक आणि सेवनावर कडक बंदी असताना, शेतकऱ्यांचे हित जोपासणारे तालुका कृषी कार्यालयच शासनाच्या गुटखा बंदीच्या आदेशाची पायमल्ली करीत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

तालुका कृषी कार्यालयातील वॉशरूम (बेसिन) गुटखा खाऊन मारलेल्या पिचकाऱ्यांनी पूर्णपणे जाम झाले आहे. तर शौचालयामध्ये सर्वत्र गुटख्याच्या पिचकाऱ्या, घाण आणि दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या शेतकऱ्यांना, महिलांना नाक दाबून जावे लागत आहे. ही अत्यंत लाजिरवाणी बाब समोर आली आहे.

महाराष्ट्र शासनाने अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत गुटख्यावर बंदी घातली आहे मग प्रश्र्न असा निर्माण होतो की, शासकीय कार्यालयातच कर्मचाऱ्यांना गुटखा मिळतो कुठून? जर कार्यालयातच कर्मचारी खुलेआम गुटखा खाऊन पिचकाऱ्या मारल्या जात असल्याने येथील कर्मचाऱ्यांना कोणाचाही वचक राहिला नसल्याचे जनतेतून बोलले जात आहे.विषेश म्हणजे या कार्यालयात महिला कर्मचारीही आहेत या महिलांच्या व शेतकऱ्यांच्या समोरच कर्मचारी गुटखा खातात.

शासकीय कार्यालय हे जनतेचे मंदिर असते. तिथे स्वच्छता आणि शिस्त असणे अपेक्षित आहे. मात्र येथे स्वच्छ भारत अभियानाचीच पायमल्ली होत आहे. वॉशरूम जाम झाल्याने पाणी तुंबून राहते आणि रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

अधिकारी कर्मचाऱ्यांनीच नियम पाळला नाही तर शेतकऱ्यांनी काय आदर्श घ्यायचा? अशी संतप्त सवाल शेतकऱ्यांतून व्यक्त केला जात आहे.

तालुका कृषी अधिकारी यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधित गुटखा खाणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी.कार्यालयात गुटखा मुक्त कार्यालय आणि थुंकण्यास सक्त मनाई चे फलक लावावेत.दररोज स्वच्छता केली जावी आणि सीसीटीव्ही फुटेज तपासून घाण करणाऱ्यांना दंड आकारण्यात यावा.

जोपर्यंत शासकीय कर्मचारीच गुटखामुक्त होत नाहीत, तोपर्यंत महाराष्ट्र गुटखामुक्त होणार कसा? असा सवाल आता नागरिकांतून उपस्थित होत आहे.

उदयगिरीत विद्यार्थी कल्याण मंडळ उद्घाटन व गुणवंतांचा सत्कार संपन्न

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २४ ऑक्टोबर : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळाचे उद्घाटन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला, अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर होते तर उद्घाटक म्हणून उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे उपस्थित होते, मंचावर संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष माधवराव नोबदे, सदस्य इंजि. मन्मथ बिरादार, श्रीमती भाग्यश्री चाकूरकर, प्रा. आडेप्पा अंजुरे, शिवराज वल्लापुरे, भीमाशंकर मुद्दा, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. एस.एन. हल्लाळे, उपप्राचार्य टी. एन. सगर, पर्यवेक्षक प्रा. एस. व्ही. मुडपे व विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रभारी प्रा. डॉ. एस. एन. लांडगे यांची उपस्थिती होती. विविध मान्यवरांनी ठेवलेल्या पारितोषिकांचे वितरण बारावी, पदवी व पदव्युत्तर गुणवंत विद्यार्थ्यांना करण्यात आले, दीपप्रज्वलनाने मान्यवरांच्या हस्ते कल्याण मंडळाचे उद्घाटन झाले व विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली, प्रातिनिधिक पाच विद्यार्थ्यांना परीक्षा फीची रक्कम परत करण्यात आली.

यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे म्हणाले, विद्यार्थी कल्याण मंडळाच्या माध्यमातून नेतृत्व क्षमता विकसित होत असते, विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन समाजाचे प्रश्र्न समजून सोडवण्याचा प्रयत्न करावा. अध्यक्षीय समारोपात बसवराज पाटील नागराळकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी संकल्प केल्यास यश अशक्य नाही, न्यूनगंड व नकारात्मक विचार सोडून द्यावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. डॉ. अर्चना मोरे यांनी केले, पारितोषिक वितरणाचे वाचन प्रा. डॉ. ए. यु. नागरगोजे, प्रा. डॉ. आर. बी. अलापुरे, प्रा. प्रवीण जाहुरे, प्रा. डॉ. एम.जे. कुलकर्णी यांनी केले तर आभार विद्यापीठ प्रतिनिधी आसिया पठाण हिने मानले.

देविदास बनसोडे यांचे निधन



तभा वृत्तसेवा

औसा दि. २४ ऑक्टोबर : येथील सेवानिवृत्त कर्मचारी तथा सामाजिक कार्यकर्ते देविदास विठ्ठलराव बनसोडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले असून त्यांच्यावर आज सकाळी११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत .

सेवानिवृत्ती नंतर त्यांनी सामाजिक क्षेत्रात खूप कामं केली असून गोर गरिबांना सधळ हातानी नेहमी मदत करण्यास तत्पर असायचे . औसा शहरासह तालुक्यात दादा या नावानी प्रसिध्द होते . त्यांना संगिताची खूप आवड होती . भजनासाठी ते कोठेही जात असतं असे बहुरंगी व्यक्ती असलेले दादा पुन्हा होणे नाही .

त्यांच्या पश्च्यात चार मुले, एक मुलगी, सूना, नात, नातू असा परिवार आहे

आपापसातील संबंधाबरोबरच व्यवहार सुसह्य होण्यासाठी कौशल्य तुमचे महत्त्वाचे ठरतात : हंगरगे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २४ ऑक्टोबर : आयुष्य सुखी करायचे असेल तर एक दुसऱ्याला समजून घेणे अनिवार्य आहे. इतरांशी संबंध प्रस्थापित करत असताना कौशल्य तुमचे, जीवन कसं जगावं? यासाठी महत्त्वाचे ठरतात, त्यामुळे संबंध सलोख्याचे होऊन व्यवहार सुसह्य होतात असे मत रमेश हंगरगे यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत गेल्या सोळा वर्षापासून सातत्याने चालू असलेल्या वाचक संवादाचे ३७१ वे पुष्प श्रीमती प्रेमला नळगिरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी आदर्श शिक्षक, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख श्री रमेश हंगरगे यांनी श्री अनंत खेर लिखित कौशल्य तुमचे, जीवन कसं जगावं? या साहित्यकृतीवर अत्यंत विनोदी शैलीत अगदी सहजतेने संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले की मानवी शरीर हा एक अद्भुत चमत्कार आहे. जस हे शरीर टिकवण्यासाठी अन्न-पाणी याची गरज असते तसं आपल्या शरीरातच अदृश्य स्वरूपाने असलेल आपलं मन स्तुति ऐकण्यासाठी आसुसलेला असत. मात्र स्तुती ही व्यक्ती पेक्षा कार्याची करावी त्यामुळे त्या कार्यास शरीरही साथ देते.

यानंतर झालेल्या चर्चेत उपस्थितांपैकी तुळशीदास बिरादार, मोहनराव निडवंचे, सूर्यकांत पांचाळ यांच्यासह अनेकांनी सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थितांना जन्म दिनाची ग्रंथ भेट देण्यात आली.

शेवटी अध्यक्षीय समारोपात श्रीमती प्रेमला नळगिरे म्हणाल्या की, वाचक संवाद हा एक परिपूर्ण कार्यक्रम आहे. कारण यात तज्ञ व अभ्यासू व्यक्तींना पाचारण केलं जातं. इथं स्वतःची कौशल्य वापरून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले जाते. सुखी जीवनासाठी तुमची कौशल्य वापरा असा संदेश लेखकाने या पुस्तकाच्या माध्यमातून दिलेला आहे असेही त्या म्हणाल्या.

मुरलीधर जाधव साहेब यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर आभार गोविंदराव सावरगावे यांनी मांडले. या कार्यक्रमाचे यशस्वीततेसाठी प्रा. राजपाल पाटील, हनुमंत म्हेत्रे, संजय गिरी, तुकाराम बिरादार, प्रा.सुरेश शिंदे बेंबरेकर , प्रा. राजेंद्र एकंबेकर, यशवंत बिरादार व संयोजक अनंत कदम यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

दुष्काळात मोफत रूग्णवाहिका सेवेचा शिवसंकल्प
शेतकरी, शेतमजूर, महामार्गावरील अपघातग्रस्तांना दिलासा

तभा वृत्तसेवा

औसा दि २४ ऑॅक्टोंबर : दुष्काळाने शेतीचे अर्थकारण कोलमडले, रोजगाराच्या संधी कमी झाल्या आणि ग्रामीण कुटुंबांपुढे उदरनिर्वाहाचा प्रश्र्न उभा राहिला. अशा परिस्थितीत आजारपण किंवा अपघाताचे संकट ओढवले तर रुग्णालयापर्यंत पोहोचण्याचा खर्चही कुटुंबासाठी मोठी चिंता ठरतो. ही अडचण लक्षात घेऊन तालुक्यातील उजनी येथील शिवसंकल्प फाउंडेशन फॉर रूरल ट्रान्सफॉर्मेशनने गरजू रुग्णांसाठी रुग्णवाहिका सेवा पूर्णपणे मोफत करण्याचा पुढाकार घेतला आहे. दुष्काळाच्या कठीण काळात आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण कुटुंबांना दिलासा देणारा उपक्रम ठरत आहे.

उजनीपासून ३० किलोमीटरच्या परिघातील गरजू रुग्णांसह राष्ट्रीय महामार्गावरील अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. औसा, लातूर, तुळजापूर, धाराशिव, सोलापूर आणि बार्शी येथील रुग्णालयांपर्यंत रुग्णांना पोहोचविण्यासाठी सेवा उपयोगी ठरणार आहे. आर्थिक अडचणींमुळे उपचारांसाठी विलंब होऊ नये. आणि आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळावी. हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

गरजूसाठी आधार डॉ. मुद्दसीर सय्यद

गेल्या चार वर्षांत ५०० हून अधिक रुग्णांना या सेवेचा लाभ मिळाला आहे. एका दुर्दैवी घटनेतून सुरू झालेली सेवा आज ग्रामीण भागातील गरजू रूग्णांसाठी मोठाआधार ठरत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. मुद्दसीर सय्यद यांनी दिली.

एका दुर्दैवी घटनेतून सेवेचा शिवसंकल्प.

उजनी येथील शेतकरी स्व. मारुती श्रीरंग ढवण यांचा ३ एप्रिल २०२२ रोजी राष्ट्रीय महामार्गावरील अपघातात मृत्यू झाला. या वेळी वेळेत रुग्णवाहिका न मिळाल्याने ग्रामीण भागातील आरोग्यसेवेची उणीव प्रकर्षाने जाणवली. भविष्यात अन्य कोणत्याही कुटुंबावर अशी वेळ येऊ नये. या भावनेतून शिवसंकल्प फाउंडेशनचे विश्र्वस्त, स्वयंसेवक, ग्रामस्थ, मित्र आणि नातेवाईक एकत्र आले. लोकसहभागातून ८ ऑगस्ट २०२२ रोजी कृषिरत्न श्री. बी. बी. ठोंबरे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. अशोक ढवन आणि गावातील इतर मान्यवरांच्या उपस्थितीत रुग्णवाहिका सेवा सुरू झाली. चार तालुक्यांच्या सीमावर्ती भागातील उजनी हे या सेवेचे केंद्र बनले. मोठ्या आरोग्य सुविधांसाठी ४० ते ५० किलोमीटरचे अंतर पार करावे लागणाऱ्या ग्रामीण रुग्णांसाठी हीच सेवा आज आधार ठरत आहे. रुग्णवाहिकेसोबतच वाचन चळवळ, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धन या विषयावर शिवसंकल्प कार्यरत आहे.

थोडक्यात महत्वाचे....

बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपन

परभणी : माजी आमदार तथा भाजपा ज्येष्ठ नेते आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रामप्रसाद बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेवक जिजा थोरात यांच्या संकल्पनेतून खानापूर नगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.या उपक्रमातून पर्यावरण संवर्धन व सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. यावेळी नगरसेवक व्यंकटेश जुकटे, रितेश जैन, अद्वैत पार्डीकर, शंकर आजेगावकर, श्रीपाद दैठणकर, वैभव शिंदे, शुभम थोरात यांच्यासह आरोग्य केंद्रातील कर्मचारी, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरस्कार विजेते किरण झरकर यांचा सत्कार

परभणी : राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित धाराशिव येथील शिक्षक किरण प्रकाश झरकर यांचा शिवराम नगर येथील श्री कालिका देवी मंदिरात गुरुवार दि.२३ रोजी सत्कार करण्यात आला. संस्थेचे पदाधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात झरकर यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात आला.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळवून झरकर यांनी महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविला आहे. त्यांच्या या यशाबद्दल उपस्थितांनी अभिनंदन केले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष विलास वानरे, उपाध्यक्ष उद्धवराव विश्वंभर, सचिव भारत कते, कोषाध्यक्ष अशोक शिलवंत यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सत्कार समारंभानंतर श्री कालिका देवी नवरात्र महोत्सव कमिटीच्या वतीने उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून गुणवंत शिक्षकांचा सन्मान करण्यासोबतच सामाजिक एकोपा आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यात आला.

बोरी परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था

बोरी: बोरी शहराला जोडणाऱ्या ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असून, खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असून, प्रशासनाने तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. निवळी, वर्णा, पिंपरी, कसर, बोर्डी, डोहरा, मुडा, नागनगाव, गणपूर, माक, वाघी, बोबडे, जवळा खुर्द, नांदगाव, मालेगाव, पिंपळगाव व मंगरूळ तांडा आदी गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची अवस्था खराब झाली आहे. हे रस्ते परभणी-जिंतूर महामार्गाला जोडत असल्याने या मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. मात्र, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे प्रवास धोकादायक बनला आहे.ग्रामीण भागातील रुग्णांना रात्री-अपरात्री बोरी, परभणी व इतर ठिकाणी उपचारासाठी नेताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. रस्त्यांमुळे प्रवासास विलंब होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. वारंवार मागणी करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

परभणीत आज मस्जिद परिचय कार्यक्रम

परभणी: राष्ट्रीय एकात्मता,बंधुता,सामाजिक सलोखा आणि धार्मिक सद्भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने परभणीतील ईनायत नगर येथील मस्जिद ईनायत व मदरसा ईनायत उल उलूम येथे रविवार दि.२५ रोजी दु.२.३० ते ४.३० या वेळेत 'मस्जिद परिचय कार्यक्रम' आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात मस्जिद म्हणजे काय, तसेच मस्जिदमध्ये प्रार्थना कशी केली जाते, याविषयी माहिती देण्यात येणार आहे. सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमास सर्वांनी इष्टमित्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन मस्जिद कमिटी व समस्त मुस्लिम समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

कटारे यांच्या वाढदिवसानिमित्त संविधानाचे वाटप

परभणी: दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटाचा सामना करत असल्याने सामाजिक कार्यकर्ते कृष्णा कटारे यांनी वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून साधेपणाने वाढदिवस साजरा करत भारतीय संविधानाचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रम राबविण्यात आला. संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांचा प्रसार व्हावा, हा या उपक्रमाचा उद्देश होता. या वेळी कीर्तीकुमार बुरांडे, प.स.सदस्य रमेश सूर्यवंशी, नरेश जोगदंड, कॉ.प्रसाद गोरे, सरपंच मारुती लोखंडे, लक्ष्मण लांडे, बाळासाहेब तूपसमिंद्रे, विष्णू पोळ, गजानन काळे, प्रज्ञाताई आदी उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वीतेसाठी किशोर हरकळ, किशन वाकळे, अरुण तरफडे, शिवाजी चव्हाण, अक्षय शिंदे यांच्यासह मित्रपरिवाराने सहकार्य केले.

परभणीत ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग

मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष, गुजरी बाजार, वांगीरोड परिसरात अस्वच्छता

परभणी (प्रतिनिधी): परभणी शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचत असल्याचे चित्र दिसत असून, गुजरी बाजार आणि वांगी रोड परिसरासह विविध भागात स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सार्वजनिक ठिकाणी साचणाऱ्या कचऱ्यामुळे नागरिकांना अस्वच्छतेचा सामना करावा लागत असून, महानगरपालिका प्रशासनाच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

गुजरी बाजार, नानलपेठ, कच्छी गल्ली आणि वांगी रोड हे नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असलेले परिसर आहेत. या भागांत कचऱ्याची नियमित उचल आणि साफसफाई होणे आवश्यक आहे. मात्र, ठिकठिकाणी कचरा साचत असल्याने परिसराच्या स्वच्छतेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरणे, माशा व डासांचा प्रादुर्भाव वाढणे आणि नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

एकीकडे शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले जाते, तर दुसरीकडे सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसत असल्याने स्वच्छतेच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित होत आहेत. शहरातील स्वच्छता व्यवस्था प्रभावीपणे राबविण्याची गरज यानिमित्ताने अधोरेखित झाली आहे.

महानगरपालिका प्रशासनाने गुजरी बाजार, नानलपेठ, कच्छी गल्ली, वांगी रोडसह शहरातील विविध भागांची पाहणी करून साचलेला कचरा तातडीने उचलावा.तसेच नियमित कचरा संकलन, सार्वजनिक ठिकाणांची साफसफाई आणि स्वच्छतेवर देखरेख ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन प्रभावी कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पुस्तकी ज्ञानाला कृतीची जोड, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण

सेलू (प्रतिनिधी): स्वारातीम विद्यापीठांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ओटीजी उपक्रमांतर्गत नूतन महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे २२ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत प्रत्यक्ष ओटीजी प्रशिक्षण सुरू झाले आहे.

विविध शासकीय कार्यालये, औद्योगिक संस्था, व्यावसायिक आस्थापने, संगणक प्रशिक्षण केंद्रे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कवडधन येथे विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, जिल्हा समन्वयक डॉ. बाविस्कर आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा.डॉ. निर्मला पद्मावत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम.लोया, सचिव प्राचार्य डॉ.व्ही.के. कोठेकर आणि प्राचार्य डॉ.उत्तम राठोड यांचे सहकार्य लाभत आहे. महाविद्यालयाचे समन्वयक प्रा.प्रसाद पांडे व प्रा.डॉ. एस. बी.गरूड यांच्या नियोजनातून प्रशिक्षणाची अंमलबजावणी सुरू असून, विविध प्राध्यापक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष कार्यानुभव मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता, संवादकौशल्य आणि व्यावसायिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होत आहे. विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर व रोजगाराभिमुख बनविण्याच्या दृष्टीने विद्यापीठाचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

परभणीत १३ लाखांचा हळद पावडर जप्त

परभणी (प्रतिनिधी): सणासुदीच्या पार्श्वभूमीवर 'सुरक्षित अन्न-निरोगी महाराष्ट्र' या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात धडक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत भेसळीच्या संशयावरून सुमारे १३ लाख ४ हजार ४०० रुपये किमतीचा ४,३४८ किलो हळद पावडर साठा जप्त करण्यात आला असून, अन्न सुरक्षा नियमांचे गंभीर उल्लंघन केल्याप्रकरणी जिल्ह्यातील दोन आस्थापनांचे परवाने तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने दि. २२ रोजी सेलू-वालूर रोडवरील ब्रम्हणगाव येथील मे. अभिनव फूड प्रॉडक्ट्स या पेढीवर छापा टाकला. या ठिकाणी खाद्यरंग भेसळ असल्याच्या संशयावरून, तसेच अनारोग्यकारक हाताळणी व अयोग्य पॅकिंग आढळल्याने १३ लाख रुपयांचा हळद साठा जप्त करण्यात आला. या पेढीमध्ये अन्न सुरक्षा व मानदे नियमन, २०११ च्या परिशिष्ट-४ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे निष्पन्न झाल्याने संस्थेचा परवाना रद्द करण्यात आला आहे. जप्त केलेल्या हळदीचे नमुने अन्न विश्लेषण प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून, प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर न्यायालयात खटला भरला जाणार आहे.

दुसऱ्या कारवाईत, शहरातील रहेमत नगर येथील मे. के. के. बेकर्स या पेढीची तपासणी करण्यात आली. या ठिकाणी एफएसएसएआय परवाना अद्ययावत न करणे, कामगारांच्या वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव, ॲप्रन व हेडगियरचा वापर न करणे, आस्थापनेत अस्वच्छता, कीटक नियंत्रणाचा अभाव आणि सुरक्षित अन्नपदार्थ तयार करण्यासाठी अपुरी व्यवस्था आढळल्याने या बेकरीचा परवाना देखील तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला.

ही धाडसी कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी ठोंबरे व मुळे तसेच सहाय्यक आयुक्त (अन्न) अनंत चौधरी यांच्या पथकाने सहआयुक्त (छत्रपती संभाजीनगर विभाग) श्रीकांत करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

पोलिस स्मृतिदिनानिमित्त पोलीस अधिक्षक पंकज कुमार यांच्या संकल्पनेतुन पोलिस मुख्यालय परिसरात स्टुडंट पोलीस कॅडेट उपक्रमांतर्गत शहरातील विद्यार्थ्यांसाठी पोलीस विभागाचे कामकाज, प्रात्यक्षिक आणि प्रदर्शनास विद्यार्थ्यांनी भेट दिली. (छाया: राहुल धबाले)

जिंतुर शहराला रेल्वे मार्गाशी जोडण्याची मागणी

जिंतुर (प्रतिनिधी):जिंतूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि स्थानिक व्यापाराला गती देण्यासाठी जिंतूर शहराला रेल्वे मार्गाशी जोडावे, अशी मागणी भाजपा व्यापारी आघाडी व जिंतूरकरांच्या वतीने पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात जिंतूरला रेल्वे नेटवर्कशी जोडण्यासाठी तीन महत्त्वाचे पर्यायी मार्ग सुचवण्यात आले आहेत. यामध्ये परभणी व्हाया जिंतूर-लोणार-बुलढाणा, परभणी-जिंतूर-वाशिम आणि मानवतरोड - वालूर - जिंतूर-औंढा नागनाथ -हिंगोली या तीन प्रस्तावित मार्गांचा समावेश आहे. यातील कोणत्याही एका मार्गाला मंजुरी मिळाल्यास जिंतूरसह संपूर्ण परभणी जिल्ह्याच्या विकासाला मोठा वेग प्राप्त होणार आहे.जिंतूर येथे जागतिक दर्जाचे जैन धार्मिक पर्यटन क्षेत्र असलेले श्री क्षेत्र नेमगिरी

संस्थान (श्री नेमिनाथ भगवान) असल्याने दरवर्षी देशभरातून हजारो भाविक येतात; म त्र रेल्वे सेवा उपलब्ध नसल्याने भाविकांसह नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी या मागणीवर अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देत या विषयाची संपूर्ण तांत्रिक व प्रशासकीय माहिती घेऊन तात्काळ शासनाकडे अधिकृत प्रस्ताव सादर केला जाईल, असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

यावेळी भाजप व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कोकडवार, जिल्हा भाजप मंत्री डॉ.पंडित दराडे, नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख, तालुकाध्यक्ष गोविंद थिटे, शहराध्यक्ष विलास भांडारी, तोषनिवाल, दायमा, सुनील भोंबे यांच्यासह भाजप पदाधिकारी व जिंतूरकर नागरिक उपस्थित होते.

कौसडी आरोग्य केंद्रात रिक्त पदामुळे रूग्णसेवा ठप्प

कौसडी (प्रतिनिधी): कौसडी प्राथमिक आरोग्य केंद्रमार्फत उपकेंद्रात एकूण तेरापदे रिक्त असल्यामुळे रुग्णसेवा ठप्प झाली आहे.

कौसडी गाव वीस हजार लोकसंख्येच्या असून या ठिकाणी दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या ठिकाणी सर्व रिक्त पदे भरणे आवश्यक असताना हे पदे गेल्या अनेक दिवसापासून रिक्त आहेत त्यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाही. या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत होती. नुकतेच डॉक्टर तोसिफ अन्सारी या ठिकाणी रुजू झाले असून या एकच अधिकाऱ्यावर रुग्णाच्या कारभार सुरू आहे. कौसडी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत असणाऱ्या सर्व उपकेंद्रात आरोग्य सेविका आरोग्य सेवक सर्व रिक्त पदे भरण्यात तात्काळ नेमणूक करण्यात यावा.आदी मागण्या पूर्ण करण्यात यावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रात कार्यरत पदे अनेक ठिकाणी रिक्त असल्याने आरोग्य सेवांवर याचा परिणाम होतांना दिसत आहे.

संगीत महाविद्यालयाच्या वतीने सुर स्वरयोगी परळीकरांचा

परभणी (प्रतिनिधी): आत्म ानंद संगीत महाविद्यालयाच्या वतीने आयोजित हा सुर स्वरयोगी परळीकरांचा सोहळा कृतज्ञतेचा हा गुरूपुजन व पुरस्कार वितरण सोहळा कोजागिरी पोर्णिमेनिमि त्त रविवार दि.२५ रोजी स्व. चंद्रभागाबाई वारकरी शिक्षण संस्थेच्या सभागृहात आयोजन करण्यात आला आहे.

यावेळी संगीत महाम होपाध्याय सुरमनी डॉ.कमलाकर परळीकर यांचा गुरूपुजन सोहळा तसेच संगीत, भजन, वारकरी, व सांस्कृतीक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना ब्रम्हलीन गायनाचार्य रामकृष्ण सोनुने गुरूजी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी विद्यार्थ्यांचा गायन कार्यक्रम होणार आहे.सायंकाळी शास्त्रीय संगीताची मैफल होणार आहे. यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील पखवाज वादक मनोह सोहळंके व सितार वादक अली खान यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन आत्मानंद संगीत महाविद्यालयाचे संचालक संदीप देशमुख यांनी केले असुन यशस्वीतेसाठी विद्यालयाचे विद्यार्थी, स्वयंसेवक व सहकारी परिश्रम घेत आहेत.

वाहतुकीची कोंडी सोडविण्याची मागणी

परभणी : शहरातील म ध्यवस्ती असलेल्या गांधी पार्क, गुजरी बाजार, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कच्छी गल्ला व नानलपेठ या भागात दररोज होणारी वाहतुकीची कोंडी सोडवावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे. परभणी शहरातील रस्ते आधीच अरूंद आहेत. त्यातच वाहनांची वाढती संख्या व ऑटोचालकाचा निष्काळजीपणाने वावर यामुळे सर्वसामान्य पादचारी नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील वाढती वाहतुक कोंडी शहर वाहतुक शाखेने तात्काळ सोडवावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे.

तब्बल ५ गुन्ह्यात पसार असलेला आरोपी ताब्यात

पालम (प्रतिनिधी): पालम पोलीस ठाण्याच्या हद्दीत फरार व पाहिजे असलेल्या आरोपींच्या शोधासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेला आज मोठे यश आले असून, पालम पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या तब्बल ५ गंभीर गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या एका अट्टल आरोपीला पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. किशन उर्फ भुऱ्या भगवान चव्हाण असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पालम पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यांतील पाहिजे असलेला आरोपी किशन उर्फ भुऱ्या चव्हाण हा हिंगोली जिल्ह्यातील आरळ येथे आला असल्याची खात्रीशीर व गोपनीय माहिती पालम पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ हालचाली करत आरळ परिसरात वेगाने धाव घेतली. त्या ठिकाणी अत्यंत सावधगिरीने सापळा रचून आरोपीचा कसून शोध घेण्यात आला. पोलिसांची चाहूल लागताच पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीला पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले आणि त्याला पालम पोलीस ठाण्यात आणले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी आरोपीला गुन्ह्याच्या तपासी अंमलदारांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

अटक करण्यात आलेल्या या अट्टल आरोपीवर पालम पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार पाच गुन्हे दाखल आहेत. पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या आदेशान्वये करण्यात आलेल्या या धडक कारवाईत पालम पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक लोणीकर,पोलीस उपनिरीक्षक चिट्टेवार, पोलीस अंमलदार गणेश खोमणे, परसराम गायकवाड आणि सुदाम धुळगुंडे आदींनी ही कारवाई केली.

नोव्हेंबरच्या धान्य वाटपात सप्टेंबरचा कोटा लागु करा

जिंतुर (प्रतिनिधी) :नोव्हेंबर मध्ये रास्त भाव दुकानांमार्फत वितरित करण्यात येणारा धान्यसाठा सप्टेंबर च्या नियमित वाटप पद्धतीनुसार आणि कोट्यानुसार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेने केली आहे. यासंदर्भात संघटनेच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

जिंतूर तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार शासनाच्या नियमांनुसार आणि प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली शिधापत्रिकाधारकांना नियमित धान्य वितरण करतात. त्यामुळे नोव्हेंबर महिन्यातील धान्यसाठ्याचे नियोजन सप्टेंबर महिन्यातील नियमित वाटप पद्धतीनुसार करण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. धान्य वाटपाच्या पद्धतीत बदल झाल्यास दुकानदारांना तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागू शकतो.तसेच शिधापत्रिकाधारकांना त्यांच्या हक्काचे धान्य मिळण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन नोव्हेंबर महिन्याचा धान्यसाठा सप्टेंबरच्या नियमित कोट्यानुसार उपलब्ध करून द्यावा, असे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे.

या निवेदनावर सुहास जिंतूरकर,हाजी अ.खालेद देशमुख, विलास वट्टमवार, हाजी अ. आहाद, सुशील पवळे, शेख अतीक खैसर, शेख महबब यांच्यासह अनेक स्वस्त धान्य दुकानदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

संशोधन कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल

बँकाक येथील प्रशिक्षणात डॉ. भगवान आसेवार यांचे सादरीकरण

परभणी (प्रतिनिधी): वनामकृवितील संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी थायलंडमधील पाथुम थानी येथील एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे आयोजित 'हवामान अनुकूल डिजिटल शेती आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान' या विषयावरील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रमात विद्यापीठाच्या संशोधन कार्याचे सादरीकरण केले.त्यांच्या सादरीकरणातून विद्यापीठाचे संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि कृषी क्षेत्रातील योगदान आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाले.

दि.५ ते १६ या कालावधीत आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमात १२ देशांतील ३५ प्रतिनिधींनी सहभाग घेतला. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेती अधिक सक्षम, शाश्वत आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यासाठी उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर हा प्रशिक्षणाचा

प्रमुख उद्देश होता.

प्रशिक्षणाच्या उद्घाटन सत्रात एआयटीचे अधिष्ठाता प्रा.अनिल कुमार अनाल, उपअधिष्ठाता प्रा. अविषेक दत्ता आणि अभ्यासक्रम संचालक डॉ.सुशील कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती.विविध देशांतील कृषी संशोधक, तज्ज्ञ आणि प्रतिनिधींना एकत्र आणणाऱ्या या प्रशिक्षणात हवामान अनुकूल शेती, डिजिटल कृषी तंत्रज्ञान आणि शाश्वत कृषी पद्धतींवर भर देण्यात आला. प्रशिक्षणांतर्गत काटेकोर शेती पद्धती, कृषी हवामान सल्ला सेवा, अचूक शेतीसाठी ड्रोन तंत्रज्ञान, हायड्रोपोनिक्स व व्हर्टिकल फार्मिंग, पुनरुत्पादक व शाश्वत शेती, बायोचार निर्मिती, स्वयंचलित सिंचनासाठी इंटरनेट ऑफ थिंग्ज, स्मार्ट ग्रीनहाऊस, आधुनिक वनस्पती उत्पादन प्रणाली आणि डिजिटल विपणन अशा विविध विषयांवर व्याख्याने, प्रात्यक्षिके व क्षेत्रभेटी आयोजित करण्यात आल्या.

या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.(डॉ.)इन्द्र मणि, राज्य शासनाचे संबंधित अधिकारी, कृषी शिक्षण व संशोधन परिषद तसेच विद्यापीठाचे संचालक आणि कुलसचिव यांचे डॉ. भगवान आसेवार यांनी आभार मानले.

कोजागिरी पोर्णिमेनिमित्त आज भक्तीसंगीताची मैफल

पाथरी (प्रतिनिधी): कोजागिरी पौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त तालुक्यातील वाघाळा येथे 'तेजोनाद' या भक्तिसंगीत कार्यक्रमाचे आज रविवार दि. २५ रोजी रात्री ९ वा. श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमातून भक्तिरस, संगीत आणि सुरेल स्वरांची अनुभूती रसिकांना घेता येणार असून, परिसरातील भाविक व संगीतप्रेमींसाठी ही एक पर्वणी ठरणार आहे. या कार्यक्रमात गायक शार्दुल कुलकर्णी हे आपल्या सुम धुर गायनातून भक्तिसंगीत सादर करणार आहेत. त्यांना गायक श्रीकांत कुलकर्णी यांची साथ लाभणार आहे. तसेच आनंद तदें हे हार्मोनियम, रामदास कुलकर्णी हे तबला, भगवान लिंगायत हे पखवाज आणि मनोज कुलकर्णी हे मंजिरीच्या माध्यमातून संगीताची साथसंगत करणार आहेत. विविध वाद्यांच्या सुरेल संगमातून भक्तिसंगीताची मैफल रंगणार आहे. कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे वाघाळा परिसरात धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ परिसरातील नागरिक, भाविक आणि संगीतप्रेम ींनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : महा विधी सेवा शिबीर आणि शासकीय योजनांच्या महामेळाव्यानिमित्त लातूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सुमारे ८७ नागरिकांची रक्तदाब तपासणी, ८५ नागरिकांची मधुमेह तपासणी, ३७ नागरिकांची सर्वसाधारण रक्त तपासणी, २५ नागरिकांची एक्स-रे तपासणी आणि ०३ नागरिकांची कॅन्सर (कर्करोग) तपासणी करण्यात आली.

याशिवाय, जनकल्याणकारी योजनांचा विस्तार करत ९० पात्र लाभार्थ्यांना आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्यात आले, तर ३२ नागरिकांची निक्षय मित्र म्हणून नोंदणी करण्यात आली. शिबिरातील वैद्यकीय तपासणी दरम्यान रक्तदाबाचे ९ आणि मधुमेहाचे ४ संशयित रुग्ण आढळून आले असून, या सर्व रुग्णांना पुढील आवश्यक वैद्यकीय तपासण्या व योग्य उपचारासाठी आरोग्य विभागाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले.

विविध वृत्त.....

माजी सैनिक, विधवा आणि पाल्यांसाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २४ ऑक्टोबर : जिल्ह्यातील माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी व त्यांच्या पाल्यांना उद्योग आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम तसेच स्वावलंबी बनवण्यासाठी लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने सन २०२६-२७ या वर्षाकरिता उद्योजकता विकासावर आधारित विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्याचे प्रस्तावित असून, याद्वारे सहभागी लाभार्थ्यांना यशस्वी उद्योजक बनण्यासाठी आवश्यक असणारे सर्वसमावेशक मार्गदर्शन पुरवले जाणार आहे.

यामध्ये प्रामुख्याने योग्य व्यवसायाची निवड करणे, सूक्ष्म व्यवसाय नियोजन, नवीन उद्योग-व्यवसाय उभारणीची प्रक्रिया, विविध शासकीय कर्ज व अनुदान योजनांची माहिती, प्रभावी वित्तीय नियोजन आणि स्वयंरोजगारासह रोजगार निर्मितीच्या विविध संधींबाबत सखोल प्रशिक्षण आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाईल.

माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तरी लातूर जिल्ह्यातील ज्या इच्छुक माजी सैनिकांना, त्यांच्या विधवा पत्नींना अथवा पाल्यांना या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे, त्यांनी ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे उपस्थित राहून आपली नाव नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

विचार शलाकाची बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : जेष्ठ विचारवंत प्रा . डॉ . नागोराव कुंभार संपादित विचारलाका हितचिंतकांची बैठक संपन्न झाली .

या बैठकीला रामकुमार रायवाडी कर, माधव बावगे, डॉ. अशोक नारनवरे, डॉ अनिल जायभाये, डॉ. विवेक सौताडेकर, रंजीत आचार्य, गंगाधर डिगोळे, डॉ. संजय गवई, प्रा . भाऊसाहेब उमाटे, डॉ . गणेश बेळंबे, उत्तरेश्र्वर बिराजदार, विराज साळुंखे, संजय व्यवहारे गणपत तेलंगे, गंगाधर गवळी, सुधीर भोसले, रुक्साना मुल्ला, हनुमंत मुंडे, डॉ गणेश गोमारे यांची उपस्थिती होती .

यावेळी उपस्थितांनी आपले मनोगत व्यक्त केले युनिक फाऊंडेशन प्रकाशन च्या वतीने प्रकाशित विशारशलाका ग्रंथामध्ये३०० लेख असून३६२० पाने आहेत . याची किंमत५११०/ असली तरी सवलती मध्ये हा ग्रंथ३७००/ मध्ये असून बाय हॅंड हवा असल्यास तो३२००/ मध्ये उपलब्ध असून त्यासाठी राहूल लोंढे मो नं .७३८५५२१३३६ यांच्याशी संवाद साधावा या ग्रंथांचे सहा खंड असून पहिला- स्वातंत्र्य, समता आणि न्याय, दुसरा- लोकशाही- धर्मनिरपेक्षता, तिसरा- महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, चौथा- प्रबोधन आणि सामाजिक चळवळी, पाचवा- शिक्षण आणि समाज तर सहावा- चार्वाक दर्शन, जैन दर्शन, बौद्ध दर्शन, महात्मा बसवेश्र्वर दर्शन . असे आहेत .

गेल्या ३९ वर्षांपासून हे मासिक वैचारिक बांधिलकीने सुरु ठेवले आहे या बैठकीत प्रास्ताविक राहूल लोंढे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. संजय गवई यांनी तर ३ उपस्थितांचे आभार भाऊसाहेब उमाटे यांनी मानले

दयानंद विज्ञान महाविद्यालयाची कोल्हापूर व रत्नागिरी येथे सहल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे एनईपी-२०२० अंतर्गत स्किल डेव्हलपमेंट तसेच ऑन दि जॉब ट्रेनिंगचा एक भाग म्हणून बी.एस्सी.तृतीय वर्ष सूक्ष्मजीवशास्त्र विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक अभ्यास सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ यांचे औद्योगिक कार्य या विषयाची माहिती मिळावी म्हणून एस.जी. फायटोफार्मा कोल्हापूर व गद्रे मराइन एक्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड रत्नागिरी येथे शैक्षणिक सहल व भेटीचे आयोजन केलेहोते. प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे व डॉ. राहुल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. महेश करळे यांनी सहलीचे नियोजन केले होते. ३१ विद्यार्थी, २ प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

जि. प. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटना, लातूर यांचेवतीने दुष्काळ ग्रस्तांसाठी त्यांना मिळणाऱ्या निवृत्ती वेतनातून आर्थिक मदत करण्याचे बैठकीत ठरले. संघटनेतील पदाधिकारी व सदस्य यांनी या कामी स्वतः होऊन पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्रात सध्या भीषण दुष्काळाची स्थिती उद्भवली असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. आपण जरी जेष्ठ नागरिक असलो तरी आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो. या उदात्त भावनेने संघटनेतील सर्व सदस्यांनी यथाशक्ती मदत करण्याचे आवाहन करण्यात आले. या दातृत्वाच्या कामास जिल्हा परिषद शिक्षकेत्तर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे संघटनेचे अध्यक्ष भातंब्रेकर, उपाध्यक्ष एनाडले, भारत काळे, सचिव मन्मथ शेटे, कोषध्यक्ष वसंत कातळे, भिसे, रवि सरदेशमुख, इंजि. आळंगे झेड. ए. सय्यद, देशमुख,` व इतर यांनी सांगितले.

लातूरमध्ये व्हॉईस ऑफ मीडियाचा दोन दिवसीय मेळावा; महिला पत्रकारितेला बळ देण्यासाठी सकारात्मक पाऊल राज्यभरातून अनेक पत्रकार महिला उपस्थित

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : पत्रकारितेला नवी ऊर्जा देतानाच महिला पत्रकारितेला अधिक सक्षम, स्वावलंबी आणि प्रतिष्ठित बनविण्याच्या उद्देशाने 'व्हॉईस ऑफ मीडिया' महिला विंगच्या वतीने लातूर येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनाचा उत्साहपूर्ण प्रारंभ झाला. औसा रोडवरील थोरमोटे लॉन्स येथे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व उद्योजिका सुनंदाताई पवार, प्रसिद्ध वृत्तनिवेदिका व पत्रकार फराह खान आणि लातूर जिल्हा परिषद सदस्या आशा भिसे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून अधिवेशनाचे उद्घाटन करण्यात आले. महिला पत्रकारांच्या कर्तृत्वाचा गौरव, त्यांच्या समस्या आणि आव्हानांवर चर्चा तसेच पत्रकारितेतील त्यांचे स्थान अधिक भक्कम करण्याच्या दृष्टीने हे अधिवेशन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याला व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के, राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले, राष्ट्रीय संघटक व सर्व विंगप्रमुख रश्मी मारवाडी, प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया, उपाध्यक्ष संगम कोटलवार आणि महिला प्रदेशाध्यक्ष वैशाली पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या महिला पत्रकार आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे अधिवेशनस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रसंगी 'व्हॉईस ऑफ मीडिया वर्ल्ड' या मुखपत्राच्या महिला पत्रकार अधिवेशन विशेषांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील महिला पत्रकारांचा जीवनप्रवास, त्यांचे संघर्ष, कर्तृत्व आणि पत्रकारितेतील योगदान यांचा वेध या विशेषांकातून घेण्यात आला आहे. कार्यकारी संपादक रश्मी मारवाडी आणि वैशाली पाटील यांनी महिला पत्रकारांच्या कार्याचा आणि अनुभवांचा शब्दरूपात मागोवा घेतला आहे. महिला पत्रकारांच्या कार्याची दखल घेणारा आणि त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाला उजाळा देणारा हा विशेषांक अधिवेशनाचे एक महत्त्वाचे आकर्षण ठरला.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी पहिल्या सत्रात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या महिला पदाधिकाऱ्यांनी व्हॉईस ऑफ मीडियाची वाटचाल, संघटनेचे कार्य आणि पत्रकारितेतील बदलती आव्हाने याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. महिला पत्रकारांना संघटित व्यासपीठ मिळणे, त्यांच्यात परस्पर संवाद आणि सहकार्य वाढणे तसेच त्यांच्या व्यावसायिक विकासासाठी नव्या संधी उपलब्ध होणे, या दृष्टीने अशा अधिवेशनांची आवश्यकता असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली.

आजच्या बदलत्या माध्यमविश्र्वात महिला पत्रकारांना केवळ व्यावसायिक स्पर्धेलाच सामोरे जावे लागत नाही, तर सुरक्षितता, कामाच्या ठिकाणचे प्रश्र्न, आर्थिक स्वावलंबन, आरोग्य आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांसारख्या अनेक आघाड्यांवरही संघर्ष करावा लागतो. या पार्श्र्वभूमीवर महिला पत्रकारांचे हक्क, त्यांची सुरक्षितता, आर्थिक स्वावलंबन आणि व्यावसायिक सक्षमीकरण यांवर विचारमंथन घडवून आणणे, हा या अधिवेशनामागील प्रमुख उद्देश आहे. महिला पत्रकारांना सक्षम करण्यासाठी सकारात्मक दिशा देणारे आणि त्यांच्या प्रश्र्नांना संघटित आवाज देणारे व्यासपीठ म्हणून या अधिवेशनाकडे पाहिले जात आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात एकूण सहा ते आठ सत्रांच्या माध्यमातून महिला पत्रकारितेशी संबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन आणि चर्चा होणार आहे. अनुभवी महिला मार्गदर्शकांच्या सहभागातून पत्रकारितेतील संधी, आव्हाने, अधिकार आणि स्वावलंबनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला जाणार आहे. पहिल्या दिवसाचा समारोप सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार असून, रविवारी अधिवेशनाचा समारोप होईल.

महिला पत्रकारांच्या अनुभवांना व्यासपीठ देणे, त्यांच्या प्रश्र्नांवर सामूहिकपणे विचार करणे आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांना अधिक सक्षमपणे वाटचाल करता यावी यासाठी प्रेरणा देणे, या उद्देशाने लातूरच्या भूमीत सुरू झालेला हा दोन दिवसीय मेळावा महिला पत्रकारितेच्या वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरण्याची अपेक्षा आहे.

मोफत कायदेशीर विषयक मार्गदर्शनासह शासकीय योजनांचा गरजू नागरिकांपर्यंत पोहचविणे गरजेचे : न्यायमूर्ती मोरे

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २४ ऑक्टोबर : शासकीय लोककल्याणकारी योजनांपासून समाजातील कोणताही पात्र आणि गरजू घटक वंचित राहू नये, यासाठी न्यायव्यवस्था आणि प्रशासनाने अत्यंत संवेदनशीलतेने काम करणे गरजेचे आहे. अशा घटकांपर्यंत कायदेविषयक माहिती आणि शासकीय योजना पोहोचविणे आवश्यक असून यासाठी विधी सेवा समितीमार्फत महा विधी सेवा शिबिरांचे आयोजन करण्यात येत असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा लातूर जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती संदीपकुमार मोरे यांनी सांगितले. लातूर येथील दिवाणजी मंगल कार्यालयात आयोजित महा विधी सेवा शिबीर आणि शासकीय योजनांच्या महामेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने या महा विधी सेवा शिबीर आणि शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन वृक्षाजलार्पण अर्थात रोपट्याला पाणी अर्पण करून अनोख्या पद्धतीने करण्यात आला. या माध्यमातून लातूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंवर्धन, पाणी बचत आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

या प्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती सुशील घोडेस्वार, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारुका, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, महानगरपालिका आयुक्त राहूल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्यंकटेश गिरवलकर आणि जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड. शिवकुमार जाधव यांच्यासह न्यायिक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, वकील, पक्षकार, विविध योजनांचे लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने प्रमुख उपस्थिती होती.

सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी शासन अनेक योजना राबवित असते. या योजनांपासून एकही पात्र व्यक्ती वंचित राहू नये, यासाठी विधी सेवा समितीच्यावतीने शासकीय योजनांचा महामेळावा घेवून योजनांविषयी जनजागृती करण्यात येत आहे. या माध्यमातून गरजू लोकांपर्यंत योजनांची माहिती पोहचण्यास मदत होईल. विधी सेवा समितीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला व मदतीसोबतच शासकीय योजनांचा लाभ थेट लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे न्यायमूर्ती मोरे सांगितले.

आज नागरी सहकारी बँकांच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ ऑक्टोबर : भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) आणि लातूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी रविवारी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत जेएसपीएम शैक्षणिक संकुलातील सभागृह, एमआयडीसी, लातूर येथे नागरी सहकारी बँकांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर हे उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र नागरी सहकारी बँक फेडरेशनचे राज्यअध्यक्ष अजय ब्रम्हेचा, आरबीआयच्या ट्रेनिंग मॅनेजर कृष्णा फुटाण, आरबीआय, नागपूरचे सहाय्यक व्यवस्थापक कैवल्य साकळगावकर हे मार्गदर्शन करणार आहेत. लातूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे उपाध्यक्ष सुहास पाचपुते यांचीही उपस्थिती राहणार आहे. या प्रशिक्षण कार्यशाळेत नागरी सहकारी बँकांसमोरील विविध आव्हाने व अडचणी, सायबर सुरक्षा, भारतीय रिझर्व्ह बँक व शासनाची धोरणे, तसेच बँकिंग क्षेत्रातील वेगाने होणारे बदल आदी विषयांवर मार्गदर्शन होणार आहे. बदलत्या बँकिंग व्यवस्थेत अधिकारी व कर्मचार्यांचे ज्ञान अद्ययावत करणे, सायबर सुरक्षेविषयी जागरूकता वाढविणे, बैंकिंग व्यवहार अधिक सक्षम व सुरक्षित करण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि रुग्णकेंद्रित पुनर्वसनाला 'इलेक्ट्रोकॉन-२६' मधून चालना

डॉ. प्रसर्ट सकुलश्रीप्रसर्ट यांचा आशावाद; एमआयटीत तिसरी आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रोथेरपी परिषद उत्साहात

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २४ ऑक्टोबर : आधुनिक तंत्रज्ञान, जागतिक स्तरावरील संशोधन आणि प्रगत उपचारपद्धतींची माहिती फिजिओथेरपी क्षेत्रातील विद्यार्थी, संशोधक आणि व्यावसायिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने लातूरमध्ये आयोजित 'इलेक्ट्रोकॉन-२६' ही तिसरी आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रोथेरपी परिषद महत्त्वपूर्ण ठरत आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि रुग्णकेंद्रित पुनर्वसन यांची सांगड घालत फिजिओथेरपी क्षेत्राच्या प्रगतीला चालना देणाऱ्या या परिषदेत आधुनिक उपचारतंत्रांवर विचारमंथन होत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, संशोशन आणि रुग्णकेंद्रित पुनर्वसनाला 'इलेक्ट्रोकॉन-२६' मधून चालना मिळेल, असा आशावाद थायलंड मधील महिडोल विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रसर्ट सकुलश्रीप्रसर्ट यांनी व्यक्त केला.

माईर्स पुणे संचलित महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी, लातूर आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयटी कॅम्पसमधील संत ज्ञानेश्र्वर डोम येथे आयोजित परिषदेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रसर्ट सकुलश्रीप्रसर्ट बोलत होते. यावेळी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अलाईड हेल्थ सायन्सेसचे अधिष्ठाता डॉ. वाय. प्रवीण कुमार, विद्यापीठाचे निरीक्षक डॉ. विजय भारतीय, परिषदेचे अध्यक्ष तथा एमआयपीटीचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, सचिव डॉ. विश्र्वनाथ पावडशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. प्रसर्ट सकुलश्रीप्रसर्ट म्हणाले की, उच्च तीव्रतेच्या लेझर प्रकाशाचा वापर करून शरीरातील खोलवर असलेल्या स्नायू, कंडरा, अस्थिबंध आणि सांध्यांशी संबंधित विकारांच्या व्यवस्थापनासाठी एचआयएलटीचा उपयोग केला जातो. गुडघ्याचा ऑस्टिओआर्थ्रायटिस, खांदेदुखी, मानदुखी आणि कंबरदुखी यांसारख्या समस्यांमध्ये या उपचारपद्धतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास करण्यात आला आहे.

पारंपरिक फिजिओथेरपी उपचारांसोबत एचआयएलटीचा वापर केल्यास वेदना नियंत्रण आणि कार्यक्षम पुनर्वसनासाठी मदत होऊ शकते. मात्र, ही सर्व आजारांवरील हमखास उपचारपद्धती नसून तिचे परिणाम रुग्णाचे निदान, शारीरिक स्थिती आणि उपचारांच्या स्वरूपानुसार बदलतात. त्यामुळे योग्य वैद्यकीय मूल्यांकन, प्रशिक्षित फिजिओथेरपिस्टचे मार्गदर्शन आणि सुरक्षिततेच्या निकषांचे पालन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी आधुनिक पुनर्वसन तंत्रज्ञानाचा अभ्यास करताना लेझरची शक्ती, ऊर्जा, तरंगलांबी, उपचाराचा कालावधी, रुग्णनिवड आणि संरक्षणात्मक उपाय यांची सखोल माहिती करून घेणे गरजेचे आहे. अशा परिषदांमुळे विद्यार्थ्यांना अद्ययावत उपचारपद्धतींचे ज्ञान मिळण्यासोबतच संशोधक आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध होते, असेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे निरीक्षक डॉ. विजय भारतीय यांनी परिषदेच्या नियोजनाचे कौतुक केले. फिजिओथेरपी शिक्षण क्षेत्रातील आगामी बदलांचा उल्लेख करताना राष्ट्रीय आयोगाचा अभ्यासक्रम २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार असल्याचे त्यांनी सांगितले. सध्याच्या प्रवेश क्षमतेसाठी एक वर्षाची मुदतवाढ मिळाली असून पुढील वर्षापासून प्रवेश क्षमता ५० किंवा १०० विद्यार्थ्यांपर्यंत निश्र्चित केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठाच्या अलाईड हेल्थ सायन्सेसचे अधिष्ठाता डॉ. वाय. प्रवीण कुमार यांनी फिजिओथेरपीमध्ये व्यायामोपचार आणि इलेक्ट्रोथेरपी या दोन्ही शाखांचे महत्त्व अधोरेखित केले. इलेक्ट्रोथेरपीच्या अभ्यासाला विशेष महत्त्व देणारी परिषद लातूरमध्ये आयोजित होणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय आयोग आणि महाविद्यालयांमध्ये समन्वय वाढवून शैक्षणिक संस्थांना प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.

परिषदेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांनी प्रास्ताविकात 'इलेक्ट्रोकॉन'च्या तीन वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेतला. वर्ल्ड सोसायटी फॉर इलेक्ट्रो-फिजिऑलॉजिकल एजंट्सच्या माध्यमातून आयोजित ही परिषद भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या प्रभावाचा संदर्भ देत बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे ही काळाची गरज असल्याचे डॉ. खत्री यांनी सांगितले.

जुन्या कौशल्यांसोबत नवीन ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणारेच भविष्यातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाऊ शकतील, असे मत त्यांनी व्यक्त केले. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत आयोजित परिसंवाद आणि चर्चांमध्ये प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मेघा बक्षी आणि डॉ. आफरीन जहाँ यांनी केले, तर आभार डॉ. विश्र्वनाथ पावडशेट्टी यांनी मानले. मराठवाड्यासह देशाच्या विविध भागांतील फिजिओथेरपीचे विद्यार्थी, संशोधक आणि तज्ज्ञांनी परिषदेत सहभाग नोंदवला.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

‘प्रौढ प्रताप पुरंदर’ महानाट्यातून शिवचरित्राचा जागर; समाजसेवेचाही संकल्प

एक हजार पाण्याच्या टाक्या, 500 महिलांना शिलाई मशीन; 26 ऑक्टोबरपासून जबिंदा मैदानावर महानाट्य, 450 कलाकारांचा सहभाग

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा, स्वराज्य स्थापनेच्या संघर्षाचा आणि राष्ट्रप्रेरणेचा जागर घडविणारे ‘प्रौढ प्रताप पुरंदर’ हे भव्य ऐतिहासिक महानाट्य २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरदरम्यान बीड बायपासवरील जबिंदा मैदानावर सादर होणार आहे. देवेंद्र सेवा महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या महानाट्यात ४५० कलाकार सहभागी होणार असून, नागरिकांना विनामूल्य प्रवेश असणार आहे. या आयोजनाच्या निमित्ताने पाणीटंचाईग्रस्त गावांसाठी एक हजार पाण्याच्या टाक्या आणि ५०० गरजू महिलांना शिलाई मशीन देण्याचा संकल्पही समितीने केला आहे.

देवेंद्र सेवा महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र साबळे पाटील यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी समितीच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. वैयक्तिक उत्सवापेक्षा समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याच्या भावनेतून यंदा महानाट्याच्या माध्यमातून सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांची सांगड घालण्यात आली आहे.

महानाट्याचे आयोजन यापूर्वी जुलै महिन्यात करण्यात येणार होते. मात्र, पावसामुळे नियोजन पुढे ढकलण्यात आले. आता २६ ऑक्टोबरपासून १ नोव्हेंबरपर्यंत नागरिकांना या महानाट्याचा अनुभव घेता येणार आहे. राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड आणि भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजनाचे नियोजन करण्यात येत आहे.

महानाट्याचे दिग्दर्शन महेंद्र राजे महाडिक करीत आहेत.

भव्य नेपथ्य, ४५० कलाकारांचा सहभाग

‘प्रौढ प्रताप पुरंदर’ महानाट्यातून छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, स्वराज्य स्थापनेची प्रेरणा, अन्यायाविरुद्धचा संघर्ष, मावळ्यांचे शौर्य, गड-किल्ल्यांचे महत्त्व, युद्धनीती आणि स्वराज्याच्या रक्षणासाठी केलेले पराक्रम उलगडले जाणार आहेत. भव्य फिरता किल्ला, तटबंदी, बुरुज, उंट, हत्ती आणि घोड्यांच्या माध्यमातून ऐतिहासिक प्रसंग साकारले जाणार आहेत. राज्याभिषेक सोहळा आणि युद्धप्रसंगांसह प्रकाशयोजना, नेपथ्य, वेशभूषा व संगीताच्या माध्यमातून शिवकालीन वातावरण उभे केले जाणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हे केवळ युद्ध आणि विजयापुरते मर्यादित नव्हते. न्याय, लोककल्याण, स्वाभिमान आणि सर्वसामान्यांच्या सहभागातून स्वराज्य उभारण्याची प्रेरणा त्यांच्या कार्यातून मिळते. तरुण पिढीला नेतृत्व, धैर्य, शिस्त, संघटनकौशल्य आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा मिळावी, तसेच शिवविचार समाजात रुजावेत, हा महानाट्याच्या आयोजनामागील उद्देश आहे.

पाणीटंचाईग्रस्त गावांना मदत, महिलांना रोजगाराची संधी

महानाट्याच्या आयोजनासोबतच ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा प्रश्न लक्षात घेऊन एक हजार पाण्याच्या टाक्या देण्याचे नियोजन समितीने केले आहे. पाणीसाठवणुकीची सुविधा उपलब्ध होऊन संबंधित गावांना दिलासा मिळावा, हा या उपक्रमामागील हेतू आहे. याशिवाय आर्थिकदृष्ट्या गरजू ५०० महिलांना शिलाई मशीन देण्यात येणार आहेत. महिलांना रोजगाराची संधी मिळावी, कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडावी आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता यावे, यासाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या महानाट्यासाठी कोणत्याही प्रकारची तिकीटविक्री केली जाणार नाही. तसेच सार्वजनिक स्वरूपात देणग्या मागितल्या जाणार नसून, समितीचे सदस्य आणि कार्यकर्त्यांच्या योगदानातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

सात वर्षांपासून समाजसेवेचा वसा

देवेंद्र सेवा महोत्सव समिती गेल्या सात वर्षांपासून आरोग्य शिबिरे, अनाथ मुलांना स्वावलंबी बनविण्यासाठी उपक्रम, महिला सक्षमीकरण आणि गरजू घटकांना मदत अशा विविध माध्यमांतून सामाजिक कार्य करीत आहे. केवळ उत्सव साजरा न करता त्यातून समाजहिताचे कार्य घडवून आणण्यावर समितीचा भर आहे. २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबरदरम्यान जबिंदा मैदानावर होणाऱ्या या महानाट्याचा लाभ इतिहासप्रेमी, तरुणाई आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन देवेंद्र सेवा महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

एमजीएममध्ये कम्युनिटी मीडिया डे उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि.२४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडिया महाविद्यालयाच्यावतीने चिंतनगाह येथे मीडिया व्हर्स या उपक्रमाच्या माध्यमातून ‘कम्युनिटी मीडिया डे’ उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी पत्रकारिता, पॉडकास्टिंग, प्रसारण आणि समाजाभिमुख माध्यमांच्या विविध पैलूंचे प्रात्यक्षिकांसह सादरीकरण केले. बी.ए. इंटरनॅशनल जर्नालिझम अँड इलेक्ट्रॉनिक मीडिया या अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमात कथाकथन, व्यक्तीच्या अभिव्यक्तीला व्यासपीठ आणि समुदायकेंद्रित माध्यमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमात सादर करण्यात आलेल्या पथनाट्यातून अश्मयुगीन काळापासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत माध्यमांच्या झालेल्या उत्क्रांतीचा प्रवास उलगडण्यात आला. तसेच प्रत्यक्ष वृत्तशाखा आणि स्टुडिओची उभारणी करून विद्यार्थ्यांना बातमी संकलन, वृत्तांकन, प्रसारण आणि पॉडकास्ट निर्मितीचा अनुभव देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना माध्यम क्षेत्रातील प्रत्यक्ष कामकाज समजून घेण्याची संधी मिळाली. कार्यक्रमातील ‘स्पीक टू द गव्हर्नमेंट’ या विशेष स्टॉलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नागरी सुविधा, सार्वजनिक प्रश्न आणि समुदायाशी संबंधित समस्यांबाबत शासकीय यंत्रणांना पत्र लिहिण्यास प्रोत्साहित करण्यात आले. यासोबतच वादविवाद स्पर्धा, मुक्त रंगमंचावरील सादरीकरणे, खाद्यपदार्थांचे स्टॉल आणि विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि व्यावहारिक माध्यम कौशल्यांना व्यासपीठ मिळाले. तसेच समाजातील विविध घटकांचे प्रश्न मांडणे, लोकसहभाग वाढवणे आणि नागरिक व प्रशासन यांच्यात संवादाचे माध्यम म्हणून कम्युनिटी मीडियाची भूमिका अधोरेखित करण्यात आली. सहाय्यक प्राध्यापिका डॉ. झैनब खान यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

भारताच्या सेमीकंडक्टर क्षेत्राच्या प्रगतीसाठी कुशल मनुष्यबळ आणि मानवी बुद्धिमत्ता महत्त्वाची – डॉ. प्रीती अदाणी

अहमदाबाद, : अदाणी युनिव्हर्सिटीच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदाणी यांनी भारतातील सेमीकंडक्टर क्षेत्र अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या दृष्टीने उद्योग आणि शैक्षणिक संस्थांनी एकत्र काम करण्याची गरज असल्याचे सांगितले. अदाणी युनिव्हर्सिटी मध्ये आयोजित ‘हार्डवेअर, इनोव्हेशन, प्रोसेसिंग अँड सेमीकंडक्टर टेक्नॉलॉजीज कॉन्क्लेव्ह 2026’ या परिषदेत त्या बोलत होत्या. उद्योगाच्या गरजांनुसार शिक्षण आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.भारतामध्ये सेमीकंडक्टर उद्योग मजबूत करण्यासाठी केवळ आधुनिक उत्पादन केंद्रे उभारणे पुरेसे नाही, तर या क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाची रचना करणे, ते विकसित करणे आणि त्यात सुधारणा करणे यासाठी सक्षम असलेले कुशल मनुष्यबळही आवश्यक आहे. आपण तयार करत असलेली यंत्रे किती बुद्धिमान बनतात, यावर आपल्या तांत्रिक प्रगतीचे खरे मोजमाप होणार नाही. तर, चांगले भविष्य घडवण्यासाठी आपण मानवी बुद्धिमत्तेचा किती योग्य वापर करतो, यावर ते अवलंबून असेल,” असे डॉ. प्रीती अदाणी यांनी सांगितले.

सीजी पॉवरने दमदार वाढ कायम ठेवली

सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेड (सीजी) ने 30 सप्टेंबर 2026 रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीने या तिमाहीतही दमदार वाढ आणि नफा नोंदवला आहे. गेल्या काही तिमाहींतील वाढीचा वेग कंपनीने कायम ठेवला आहे. बाजारातील मजबूत मागणी आणि सर्व व्यवसायांमध्ये योग्य नियोजन व शिस्तबद्ध कामकाज यामुळे ही कामगिरी साध्य झाली आहे. कंपनीच्या वाढीचा वेग आणखी मजबूत झाला असून, उत्पन्नाच्या तुलनेत नफ्यात अधिक वाढ झाली आहे.

अदाणी पॉवरचे आर्थिक वर्षाची दुसरी तिमाही 27 निकाल जाहीर

अदाणी पॉवर लिमिटेडने आर्थिक वर्ष 2026-27 च्या दुसऱ्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले असून, कंपनीने महसूल आणि नफाक्षमतेत दमदार वाढ नोंदवली आहे. कंपनीचा करानंतरचा नफा (PAT) मागील वर्षाच्या याच तिमाहीतील ₹2,906.46 कोटींवरून 141.5% वाढून ₹7,019.32 कोटी झाला. एकूण नोंदवलेला महसूल 39.4% वाढून ₹19,950.60 कोटी, तर एकूण नोंदवलेला EBITDA 45.7% वाढून ₹8,743.22 कोटी झाला. नियमित व्यवसायातून मिळणारा महसूल 28.5% वाढून ₹17,528.35 कोटी आणि नियमित व्यवसायातून मिळणारा EBITDA 18.5% वाढून ₹6,320.97 कोटी झाला.कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. बी. ख्यालिया यांनी सांगितले की, देशाच्या वाढत्या वीज गरजा पूर्ण करण्यासाठी विश्वासार्ह आणि अखंड वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यावर कंपनीचा भर आहे.

एईएसएल ची दुसऱ्या तिमाहीत विक्रमी कामगिरी

अहमदाबाद: जागतिक स्तरावर विविध क्षेत्रांत व्यवसाय करणाऱ्या अदाणी समूहाचा भाग असलेल्या अदाणी एनर्जी सोल्युशन्स लिमिटेड (एईएसएल) या भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठ्या वीज पारेषण, वीज वितरण, स्मार्ट मीटरिंग आणि ऊर्जा सोल्युशन्स कंपनीने 30 सप्टेंबर 2026 रोजी संपलेल्या तिमाहीची आर्थिक आणि व्यावसायिक कामगिरी आज जाहीर केली.

सात्त्विकदान फाउंडेशनतर्फे 100 कष्टकरी महिलांना पोषण आणि सन्मान प्रदान केला

मुंबई: महिलांच्या आरोग्य आणि सर्वांगीण कल्याणामध्ये पोषणाचे महत्त्वपूर्ण स्थान लक्षात घेऊन, जागतिक अन्न दिनानिमित्त सात्त्विकदान फाउंडेशनतर्फे मुंबईतील भांडुप येथे ‘सेहत की थाली / आरोग्याची थाळी’ (आरोग्यदायी पोषणाने परिपूर्ण थाळी) हा उपक्रम राबविण्यात आला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील कार्यरत महिलांना तातडीचे अन्नसहाय्य उपलब्ध करून देतानाच, त्यांच्यामध्ये पोषणविषयक व्यावहारिक जागरूकता निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्यामनगर, शंकरनगर आणि भांडुप पूर्व परिसरातील सुमारे 100 महिलांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. या महिला घरकामगार, बांधकाम कामगार, लघुउद्योगांमध्ये काम करणाऱ्या महिला आणि फेरीविक्रेत्या म्हणून असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत.

चांदापूर येथे राष्ट्रीय महिला शेतकरी दिन उत्साहात साजरा

चांदापूर, प्रतिनिधी : वेलस्पन फाउंडेशन फॉर हेल्थ अँड नॉलेज (WFHK) यांच्या वतीने बेटर कॉटन इनिशिएटिव्ह (BCI) प्रकल्पांतर्गत चंदापूर येथे राष्ट्रीय महिला शेतकरी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांचे शेतीतील योगदान, शाश्वत शेती पद्धती, हवामान बदलाशी जुळवून घेण्याचे उपाय आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्यात आली.

नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर “आदिशक्ती ते निसर्गशक्ती – हवामान बदल अनुकूलन आणि पर्यावरण संवर्धनात महिलांची भूमिका” हा विषय विशेषत्वाने

मांडण्यात आला. महिलांचे शेती व कुटुंब व्यवस्थापनातील योगदान अधोरेखित करताना नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि पुढील पिढीसाठी सुरक्षित पर्यावरण निर्माण करण्यामध्ये महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान हवामान बदलामुळे शेतीवर होणारे परिणाम, पावसाचे अनियमित वितरण, पाणीटंचाई, जमिनीचे आरोग्य आणि पिकांच्या उत्पादकतेसमोरील आव्हाने याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जलसंधारण, पाण्याचा काटकसरीने वापर, जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढविणे, वृक्षसंवर्धन, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा अवलंब करणे यांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

महिला शेतकऱ्यांनी दैनंदिन जीवनात पाणी बचत, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, परसबाग निर्मिती आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन यांसारख्या उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. महिलांच्या सहभागातून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे आणि हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी गावपातळीवर सामूहिक प्रयत्न करणे, हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

“महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण, शाश्वत शेतीचा विकास आणि निसर्गाचे संवर्धन यातूनच उज्ज्वल भविष्याची निर्मिती होईल,” हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

लक्ष्मीबाई जनार्धन गवारे यांचे निधन

तभा वृत्तसेवा

बिडकीन : लक्ष्मीबाई जनार्धन गवारे यांचे दि २३ रोजी सायंकाळी चार वाजून तीस मिनिटांनी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले आहे,आज दि २४ रोजी सकाळी दहा वाजता गवारे वस्ती येथून बाजार तळावरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले, त्यांचे पश्चात तीन मुलं सुना नातवंड असा परिवार आहे, त्या अशोक गवारे, मोहन गवारे,उमाजी गवारे यांच्या आई होत्या,

154 किलो वजनाच्या 20 वर्षीय तरुणावर मेडिकव्हरमध्ये बॅरियाट्रिक सर्जरी यशस्वी

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : अवघे २० वर्षे वय आणि तब्बल १५४ किलो वजन. वाढत्या वजनामुळे सतत थकवा जाणवणे, थोडे चालल्यानंतरही दम लागणे आणि गुडघेदुखीचा त्रास सहन करणाऱ्या तरुणावर छत्रपती संभाजीनगर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये बॅरियाट्रिक सर्जरी यशस्वीपणे करण्यात आली. लठ्ठपणामुळे दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम लक्षात घेऊन तज्ज्ञांच्या सल्ल्याने शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यात आला.

संबंधित तरुणाला अतिरिक्त आहार घेण्याच्या सवयीमुळे वजन वाढण्याची समस्या निर्माण झाली होती. वाढत्या वजनामुळे त्याला सतत थकवा जाणवत होता. थोडे चालतानाही दम लागत होता, तर गुडघ्यांवर अतिरिक्त भार पडत असल्याने गुडघेदुखीचाही त्रास होत होता. कमी वयातच या समस्यांचा सामना करावा लागत असल्याने वजन नियंत्रणासाठी बॅरियाट्रिक सर्जरीचा पर्याय निवडण्यात आला.

डॉ. स्वरूप बोराडे यांनी सांगितले की, बॅरियाट्रिक सर्जरी ही गंभीर लठ्ठपणावरील उपचारपद्धती आहे. या शस्त्रक्रियेमध्ये करण्यात येणाऱ्या प्रक्रियेनुसार पोटाची अन्न सामावून घेण्याची क्षमता आणि चयापचय प्रक्रियेवर परिणाम होतो. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होऊ शकते. मात्र, शस्त्रक्रियेनंतर संतुलित आहार, जीवनशैलीतील बदल आणि नियमित वैद्यकीय देखरेख आवश्यक असते.

लठ्ठपणाकडे केवळ बाह्यरूपाच्या दृष्टीने न पाहता आरोग्याच्या दृष्टीने पाहणे गरजेचे आहे. गंभीर लठ्ठपणामुळे दैनंदिन हालचालींवर मर्यादा येण्याबरोबरच मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि झोपेत श्वास घेण्यास अडथळे येण्यासारख्या समस्यांचा धोकाही वाढू शकतो, असे वैद्यकीय तज्ज्ञांनी स्पष्ट केले. मेडिकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. विशाल कुटे यांनी सांगितले की, कमी वयात वजन मोठ्या प्रमाणात वाढत असेल आणि त्यामुळे दैनंदिन जीवनात अडथळे निर्माण होत असतील, तर वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. रुग्णाची सविस्तर वैद्यकीय तपासणी करूनच बॅरियाट्रिक सर्जरीचा निर्णय घ्यावा. शस्त्रक्रियेनंतरही संतुलित आहार, नियमित व्यायाम, जीवनशैलीतील बदल आणि डॉक्टरांच्या मार्गदर्शनाचे पालन महत्त्वाचे आहे. ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी भूलतज्ज्ञ डॉ. दिनेश लहीरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ. वैभव नलावडे, साईनाथ साबळे, विजया बोचरे आणि सोनल गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

महत्त्वाची संपादकीय टीप : मूळ मजकुरातील वजनाच्या उल्लेखात विसंगती आहे. हेडलाइनमध्ये १५४ किलो, तर सुरुवातीच्या परिच्छेदात १५७ किलो नमूद आहे. वरील बातमीत १५४ किलो वजन गृहीत धरले आहे. प्रसिद्धीपूर्वी रुग्णाचे अचूक वजन निश्चित करून घ्यावे.

गणोरीत भाजपला रामराम! विजयादशमीच्या मुहूर्तावर शिंदे शिवसेनेत ‘घरवापसी’

राधाकिसन पठाडे (बापू) यांच्या नेतृत्वावर विश्वास; किशोर उबाळे (अण्णा) यांच्यासह प्रमुख कार्यकर्त्यांचा भव्य पक्षप्रवेश सोहळा

फुलंब्री/ प्रतिनिधी

शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या कणखर नेतृत्वावर आणि विकासाभिमुख कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत गणोरी येथील कार्यकर्त्यांनी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर भाजपला रामराम करून शिंदे यांच्या शिवसेनेत घरवापसी केली. या पक्षप्रवेशामुळे फुलंब्री विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या संघटनात्मक ताकदीत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद शिवसेना गटनेते, फुलंब्री विधानसभा मतदारसंघाचे भावी आमदार तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती, छत्रपती संभाजीनगरचे

सभापती तथा प्रमुख मा. श्री. राधाकिसन पठाडे (बापू) यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी नव्याने शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या पक्षप्रवेश सोहळ्यात गणोरी येथील किशोर उबाळे (अण्णा), श्री. राधाकिसन पां. उबाळे, श्री. शिवाजी पां. राऊत आणि श्री. जनार्दन भादवे यांच्यासह प्रमुख कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

युवा कार्यकर्त्यांची ऊर्जा आणि अनुभवी नेतृत्वाची साथ यामुळे फुलंब्री विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. वरिष्ठ नेतृत्वाच्या विकासाभिमुख दृष्टिकोनावर विश्वास ठेवत जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी आणि सामाजिक कार्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धारही कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आला.

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर झालेल्या या पक्षप्रवेशामुळे गणोरी परिसरातील शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीला नवे बळ मिळणार असून, आगामी काळात फुलंब्री विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणांवर या घडामोडीचा प्रभाव पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावेळी पठाडे बापूसाहेब यांचे विश्वासू समर्थक सामाजिक व राजकीय कार्यकर्ते सुदाम पाटील तांदळे व तसेच शंकर बोंगणे व त्यांचे सहकाऱ्यांची उपस्थिती होती

सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात युवती सुरक्षा जागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि. २४ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचलित,संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे 'ऊर्जा स्त्री अभियाना'अंतर्गत युवती सुरक्षा जागृती कार्यक्रमाचे दिमाखात आयोजन करण्यात आले होते.महिला व युवतींच्या सुरक्षिततेविषयी जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने घेतलेल्या या उपक्रमाला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.ऊर्जा स्त्री अभियान या मालेतला हा पहिला कार्यक्रम होता.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून सिल्लोड उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या उपनिरीक्षक मंगल महादेव सुडके उपस्थित होत्या,तर अध्यक्षस्थान शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळ,छत्रपती संभाजीनगरच्या संचालक सूनयनाताई शिवदीप काळे यांनी भूषवले. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार आणि उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ.ज्योती स्वामी, कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ. उल्हास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

युवतींना मार्गदर्शन करताना उपनिरीक्षक मंगल सुडके यांनी

स्वसंरक्षणाचे महत्त्व,महिलांचे कायदेशीर अधिकार आणि संकटाच्या वेळी घ्यावयाची खबरदारी यावर सविस्तर प्रकाश टाकला."कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी घाबरून न जाता आत्मविश्वासाने परिस्थितीचा सामना करावा आणि सुरक्षिततेबाबत सदैव जागरूक राहावे," असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात सुनयनाताई काळे यांनी युवतींच्या सुरक्षेसाठी जागरूकता,आत्मविश्वास आणि योग्य निर्णयक्षमता अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींना स्वतःच्या हक्कांची जाणीव निर्माण होते,असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.ज्योती स्वामी यांनी केले. यावेळी त्यांनी 'उर्जा स्त्री अभियान 'ही मुली व महिलांच्या विकासासाठीची योजना यापुढे सातत्याने कशाप्रकारे काम करणार आहे, त्याबाबतची भूमिका स्पष्ट केली.

पाहुण्यांचा परिचय डॉ.स्वाती कानडे यांनी करून दिला, तर सूत्रसंचालन प्रा. स्वाती देशमुख यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा.भारती पाटील यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीतील डॉ. सी.यू.भोरे,डॉ. उल्हास पाटील,डॉ.रमेश औताडे,डॉ.शंतनू चव्हाण, डॉ.रामेश्वर मगर, पंकज साबळे,डॉ.निर्मला बोराडे, प्रा. डॉ.कमलेश काळे,डॉ.दीपक पारधे,डॉ.एल.यु.मेश्राम, डॉ.संतोष पडघन,डॉ.एन.बी. गावडे,डॉ.एन.आर.गाडेकर, प्रा.डी.पी.लिंबे,प्रा.के.बी. नाले,शंकर काळे आणि राहुल चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.हा उपक्रम विद्यार्थिनींसाठी अत्यंत मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरला.